दैनिक
# राज्य लोकतंत्र
गणपती बाप्पा मोरया
www.epaper.rajyaloktantra.com    नवी दिशा... नवे विचार.....    email:rajyaloktantra75@gmail.com
बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१३० | गुरूवार, दि.०४ सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### १८ वर्षांनंतर डॅडी तुरुंगातून बाहेर

नागपूर: मुंबईच्या गुन्हेगारी जगतातील कुख्यात व्यक्तिमत्त्व आणि माजी राजकारणी अरुण गवळी यांना सर्वोच्च न्यायालयाने अखेर कारागृहातून बाहेर आला आहे. शिवसेना नगरसेवक कमलाकर जामसंडेकर हत्याकांड प्रकरणात हा जामीन मंजूर करण्यात आला असून, गवळी यांच्यावरील जन्मठेपेच्या शिक्षेविरुद्धचे अपील अद्याप प्रलंबित आहे. न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती एन. कोटेश्वर सिंग यांच्या खंडपीठाने गवळी यांच्या ७६ वर्षांच्या वयाचा आणि १७ वर्षांहून अधिक काळाच्या कारावासाचा विचार करून हा जामीन मंजूर केला आहे.

### ..पण देवेंद्र फडणवीसांचं कौतुक – संजय राऊत

मुंबई: ''मनोज जरांगे-पाटील मुंबईत आल्यानंतर भाजप नेत्यांची भाषा बदलली. त्यांनी त्यांच्याविषयी अत्यंत हीन भाषा वापरली. मराठा समाजाविषयी द्वेष पसरवण्याचे काम भाजपचे नेते करत होते. मात्र मी देवेंद्र फडणवीस यांच्या संयमाचे कौतूक करतो. ते पडद्यामागे राहून सूत्र हलवत होते. शिष्टाईचे श्रेय हे देवेंद्र फडणवीस यांचे आहे. मी त्यांचा टीकाकार असलो तरी आंदोलनात तोडगा काढण्यात त्यांचे योगदान मोठे होते. जरांगे पाटील यांनी फडणवीस यांचे आभार मानले, ही चांगली गोष्ट आहे. सरकारचेही आम्ही अभिनंदन करतो, अशा शब्दांमध्ये ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे माध्यमांशी बोलताना कौतुक केले.

### राहुल गांधी यांच्या याचिकेवरील निर्णय राखून

प्रयागराज : अलाहाबाद उच्च न्यायालयाने काँग्रेस खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या पुनर्विचार याचिकेवरील आदेश राखून ठेवला आहे. न्यायमूर्ती समीर जैन यांच्या एकल खंडपीठासमोर तीन तासांहून अधिक काळ सुनावणी झाल्यानंतर निर्णय राखून ठेवण्यात आला. आपण शिखांना चिथावले नव्हते. काही वाक्यांवरून हेतूंचा अंदाज लावता येत नाही असे राहुल यांच्यावतीने सांगण्यात आले. तथापि, विरोधी पक्षनेत्यांचे म्हणजे राहुल यांचे विधान सामान्य व्यक्तीचे विधान मानले जाऊ शकत नाही असे या प्रकरणातील फिर्यादीच्या वकिलांनी सांगितले. राहुल यांच्या वतीने उपस्थित असलेले ज्येष्ठ वकील गोपाल चतुर्वेदी म्हणाले की, कनिष्ठ न्यायालयाने माझ्या अशिलाने दिलेल्या मुद्द्यांचा विचार केला नाही. हा दखलपात्र गुन्हा आहे की नाही हे अद्याप निश्चित झालेले नाही.

### टीका करण्यापेक्षा आत्मपरिक्षण करा–विखे

मुंबई: मराठा समाजाच्या दृष्टीने ऐतिहासिक निर्णयाचे खरे शिल्पकार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच असून, या निर्णयाने ओबीसी समाजाच्या आरक्षणाला कोणताही धोका नाही. न्या.शिंदे समिती आणि कायदे तज्ञाशी चर्चा करून निर्णयाच्या मसूद्याला अंतिम स्वरूप देण्यात आले. निर्णयावर टिका करण्यापेक्षा महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिला. मंत्रीमंडळाच्या उपसमीतीने मराठा आरक्षणाच्या संदर्भात घेतलेल्या निर्णयावर व्यक्त झालेल्या मतांवर आपली प्रतिक्रिया देतांना मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विरोधकांना सुनावले आहे.

### तर राज्य सरकार स्पष्टता आणेल – तटकरे

पुणे : मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबतचा निर्णय राज्य सरकारने मंगळवारी घेतला. त्यामुळे ओबीसी समाजाच्या मनामध्ये त्यांच्या आरक्षणातून मराठ्यांना आरक्षण दिले जाते की काय? असे प्रश्न निर्माण झाले असतील. तर, त्याबद्दलची स्पष्टता, खुलासा राज्य सरकारकडून निश्चितपणे केला जाईल. महायुती सरकार सर्व घटकांना आपल्या सोबत घेऊन जाणारे सरकार असल्याने प्रत्येकाचे समाधान करण्याचा प्रयत्न करेल. असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष व खासदार सुनील तटकरे यांनी बुधवारी स्पष्ट केले.

### राज्यात अनेक ठिकाणी मुसळधार?

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाने उसंत घेतल्याचे पाहायला मिळत आहे. पण कोकणामध्ये मंगळवारपासून (ता. २ सप्टेंबर) मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. पण पुढील काही दिवसांमध्ये कोकणासह, उत्तर मध्य महाराष्ट्र मुसळधार पावसाकडून हजेरी लावण्यात येणार असल्याची माहिती हवामान विभागाकडून देण्यात आली आहे. कोकणामध्ये पुढील चार ते पाच दिवसांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस आणि मेघगर्जनेचा इशारा देण्यात आला आहे.

# नमोच्या सातव्या हप्त्यासाठी १९३२ कोटी मंजूर !

## शासन निर्णय प्रसिद्ध; शेतकऱ्यांना दिलासा

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील शेतकऱ्यांची नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या सातव्या हप्त्याची प्रतिक्षा अखेर संपली आहे. राज्य सरकारने राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या सातव्या हप्त्याच्या वितरणासाठी १९३२.७२ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे.**





केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना वार्षिक ६,००० रुपये मिळतात. त्यामध्ये भर घालून राज्य सरकार नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेद्वारे स्वतंत्रपणे वार्षिक ६,००० रुपयांची आर्थिक मदत देते. कृषी आयुक्तालयाने केंद्र सरकारच्या पीएम–किसान योजनेच्या २० व्या हप्त्याच्या आकडेवारीच्या आधारे राज्य शासनाकडे सातव्या हप्त्यासाठी निधीची मागणी केली होती. या निधीमधून पात्र लाभार्थ्यांव्यतिरिक्त, ज्या शेतकऱ्यांची पीएफएमएस नोंदणी प्रलंबित आहे किंवा ज्यांचे आधार कार्ड बँक खात्यातून वगळले गेले आहे, त्यांनाही लाभ दिला जाणार आहे. हा निधी योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याची आणि त्यात कोणताही गैरव्यवहार होणार नाही, याची खात्री करण्याची जबाबदारी कृषी आयुक्तांवर सोपवण्यात आली आहे. हा शासन निर्णय नियोजन आणि वित्त विभागाच्या सहमतीने जारी करण्यात आला आहे. ▶▶ पान २ वर

## आंदोलन करणं थांबवा–छगन भुजबळ

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारने हैदराबाद गॅझेटियरनुसार कुणबी जात प्रमाणपत्र वाटपाची अंमलबजावणी करण्यास मान्यता दिली आहे. पण राज्य सरकारच्या या जीआरमुळे ओबीसी नेते नाराज झाले आहेत. ओबीसी संघटनांकडून आज राज्यभरात आक्रमक आंदोलने करण्यात आली. ओबीसींचा हा रोष पाहिल्यानंतर ओबीसींचे नेते मंत्री छगन भुजबळ यांनी मराठा आरक्षणाच्या विरोधात आंदोलन करणं थांबवा असे आवाहन सर्व ओबीसी नेते आणि संघटनांना केलं आहे.या जीआर विरोधात आपण मुंबई हायकोर्टात याचिका दाखल करणार आहोत असेही म्हटले आहे.



मराठा आरक्षणाच्या नव्या जीआर विरोधात आंदोलनं करणं थांबवा, ▶▶ पान २ वर

## ओबीसी उपसमितीच्या अध्यक्षपदी बावनकुळे

### सरकारकडून ओबीसींसाठी स्वतंत्र मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना

**मुंबई । प्रतिनिधी**

मनोज जरांगे पाटील यांच्या मागणीनुसार हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा शासन आदेश मंगळवारी जारी करण्यात आला. यानंतर बुधवारी (दि. ३) राज्य मंत्रिमंडळ बैठकीत ओबीसी समाजासाठीही महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. ओबीसींच्या प्रश्नाबाबत एका उपसमितीची स्थापना करण्यात आली आहे.



ओबीसींच्या प्रश्नाबाबत उपसमितीमध्ये सहा मंत्री असतील. ही उपसमिती ओबीसी समाजाच्या प्रश्नांसंदर्भात ही उपाययोजना सुचवण्याचे काम करणार आहे.

ओबीसींच्या प्रश्नाबाबत एका उपसमितीची स्थापना करण्या निर्णय राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. ओबीसींसाठी स्वतंत्र मंत्रिमंडळ उपसमितीच्या अध्यक्षपदी ▶▶ पान २ वर

## मुंबईतील आंदोलनादरम्यान झालेल्या नुकसान भरपाईचे काय?

# भूमिका स्पष्ट करा, उच्च न्यायालयाचे जरांगेंना कडक आदेश



### उच्च न्यायालयाचे कडक आदेश

प्रभारी मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठाने सुनावणीदरम्यान खालील मुद्द्यांवर भर दिला. आंदोलनादरम्यान झालेल्या सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीची भरपाई कोण देणार? पोलिसांकडून काही गुन्हे दाखल झाले आहेत, पण भरपाईची प्रक्रिया काय? याबाबत स्पष्ट करा. तसेच तोंडी माहिती न देता चार आठवड्यांत प्रतिज्ञापत्र सादर करा. यात आंदोलकांनी नुकसान केले नाही, चिथावणी दिली नाही आणि जबाबदारी नाकारली आहे का, हे नमूद करा. जर आयोजक जबाबदार नसतील, तर ते स्वयंस्फूर्त आंदोलकांच्या कृती होत्या का, हे स्पष्ट करा.

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी ओबीसी प्रवर्गात समावेश, हैदराबाद आणि सातारा गॅझेटीअर लागू करण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखालील आंदोलकांनी मुंबईच्या आझाद मैदानावर ५ दिवसांचे बेमुदत उपोषण केले. पाचव्या दिवशी सरकारने मागण्या मान्य करून जीआर काढला. यामुळे आंदोलन संपले आणि आंदोलक गावी परतले. मात्र, या आंदोलनादरम्यान मुंबईतील सार्वजनिक मालमत्तेचे झालेले नुकसान हा मुद्दा आता न्यायालयात पोहोचला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने आंदोलकांना आणि आयोजकांना या नुकसानीच्या भरपाईबाबत स्पष्ट भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले आहेत. प्रभारी मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठाने याप्रकरणी सुनावणी करताना ▶▶ पान २ वर

# आरक्षणाच्या संरक्षणासाठी ओबीसी आक्रमक!

## जिल्हाधिकारी कार्यालया समोर जीआरची होळी

**बीड । प्रतिनिधी**

शासनाने एस.ई.बी. सी.च्या माध्यमातून मराठा समाजाला अगोदरच १०% आरक्षण दिलेले आहे. त्यामुळे ओबीसीमध्ये नव्याने धावलेल्या ५३ लाख नोंदी तात्काळ रद्द कराव्यात. न्या. शिंदे समिती पक्षपातीपणे काम करत आहे. त्यामुळे ही समिती बरखास्त करण्यात यावी. दि. ०२.०९.२०२६ रोजी काढलेला शासन निर्णय क्र. सीवीसी – २०२५ / प्र.क्र. १२९ हा तात्काळ रद्द करण्यात यावा या प्रमुख



मागण्यांसाठी बीड जिल्ह्यातील ओबीसी समाज बांधव आक्रमक झाला असून बुधवार दि. ३ सप्टेंबर २०२५ रोजी मोठ्या संख्येने एकत्रित येत ओबीसी प्रवर्गात मराठा समाजाची बेकायदेशीररित्या ▶▶ पान २ वर

## परळीत दहा लाखाचा गांजा पकडला

**परळी । प्रतिनिधी**

**परळी शहरातील इराणी गल्ली भागातून संभाजीनगर पोलिसांनी १० लाख ६२ हजार ६८० रुपये किमतीचा ५३ किलो १३४ ग्रॅम गांजा जप्त केला. याबरोबरच विक्रीसाठी वापरले जाणारे ३१ मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक वजन काटे, पॅकिंग मटेरियल, लेडीज पर्स, ड्रम, टब, डीव्हीआर सिस्टीम, रिक्षा आदी जप्त करण्यात आले.**



शिवाजीनगर पोलिसांनी अवैध गांजा साठा व विक्री करणाऱ्या विरुद्ध मोठी कारवाई केली. दि. ९ सप्टेंबर रोजी संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांना बातमी दाराकडून खात्रीशीर माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यांनी वरिष्ठांना माहिती दिली. त्यानंतर सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्यासह पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे व त्यांच्या टीमने परळी शहरातील वशिम उर्फ शराबी आक्रम बेग व अक्रम रफिक बेग हे दोघे इराणी गल्लीतील राहत्या घरी अवैध रीत्या गांजा बाळगत होते. त्यांच्या घरावर छापा टाकला असता दोघेही घटनास्थळावरून पळून गेले. या छाप्यामध्ये ५३ किलो १३४ ग्राम गांजा ज्याची किंमत दहा लाख ६२ हजार ६८० रुपये एवढी आहे. गांजा विक्रीसाठी वापरले जाणारे ३१ मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक वजन काटे, पॅकिंग मटेरियल, लेडीज पर्स, ड्रम, टब, डीव्हीआर सिस्टीम, रिक्षा असा एकूण १२ लाख ▶▶ पान २ वर

## पुणे–लोणावळा चौपदरीकरणास मंजूरी

**मुंबई । प्रतिनिधी**

एकीकडे मराठा आरक्षण आणि ओबीसी आरक्षणावरून राजकीय वर्तुळात घडामोडींना वेग आला असताना राज्याच्या मंत्रिमंडळाची एक महत्त्वाची बैठक झाली. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत सामाजिक न्याय, ऊर्जा, कामगार, आदिवासी विकास, नगरविकास आणि विधि व न्याय विभागाशी संबंधित अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

मराठा आरक्षणासंदर्भात काढलेल्या जीआरवरून ओबीसी नेत्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. तसेच मंत्री छगन भुजबळ यांनी मंत्रिमंडळ बैठकीत अनुपस्थित राहिल्याचे म्हटले जात आहे. सामाजिक न्याय ▶▶ पान २ वर

## भुजबळ यांचा मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठा समाजाला आरक्षण दिल्यास ओबीसी समाजावर अन्याय होईल, या भीतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते व मंत्री छगन भुजबळ यांनी बुधवारी (दि.३) मंत्रिमंडळ



बैठकीवर बहिष्कार टाकला. त्यांच्या या भूमिकेमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून महायुतीत अडचणी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

भुजबळांच्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने तातडीने बैठक बोलावली. याला उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे ▶▶ पान २ वर

# देव बाप्पा! सरकारने कोपराला गूळ तर लावला नाही ना?

राज्य लोकतंत्र

भाग सातवा । सुभाष चौरे

**बीड। पुणे : मुंबईतील आझाद मैदानावर मराठा समाजाच्या आरक्षणासाठी सुरू असलेले आंदोलन सरकारने मागण्या मान्य केल्यानंतर मागे घेण्यात आले ; मात्र या निर्णयानंतर ओबीसी समाज या निर्णयाला विरोध करू लागल्याचे दिसत आहे. हे लक्षात घेता सरकारने पुन्हा ओबीसीसाठी मंत्रिमंडळाची एक उपसमिती स्थापन केली आहे. त्यामुळे दोन्ही समाजाला खुश करण्याचा प्रयत्न राज्य सरकारकडून केला जात आहे. मात्र हा कोपराला गुळ लावण्यासारखा प्रकार तर नाही ना, अशी चर्चा काही अभ्यासक करत आहेत. नेमके काय आहे ते घटना तज्ञ आणि देवच जाणे.**

गणपती बाप्पा, मराठा समाजाच्या आरक्षणासाठी गेली पाच दिवस मुंबईतील आझाद मैदानामध्ये उपोषण सुरू होते. शासनाने गठीत केलेल्या उपसमितीचे अध्यक्ष मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून आंदोलकाच्या मागण्या पूर्ण करणारा शासनादेश काढल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले. मात्र दुसरीकडे ओबीसी समाजामध्ये आरक्षण गेले अशी भीती निर्माण झाली यामुळे हा सर्व ओबीसी समाज आपल्या विरोधात जाऊ नये किंवा पुन्हा असे मोठे एखादे आंदोलन उभा राहू नाही यासाठी शासनाने त्यालाही पर्याय दिला आहे. विशेष म्हणजे आंदोलन मागे घेतल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून ओबीसी नेते आक्रमक झाले आहेत. राज्यभरात ठिकठिकाणी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर या आदेशाची होळी करण्यात आली. शिवाय या दिलेल्या आरक्षणाला विरोध सुरू झाला असे असले तरी दोन्ही बाजूचे घटना तज्ञ यातील अभ्यासु व्यक्तींनी आपली वेगवेगळी मते मांडली आहेत आणि मांडत आहेत. कोणी म्हणते टिकणारे आरक्षण आहे तर कोणी म्हणत आहे कायद्याच्या चौकटीत टिकणार नाही. असो, दुसरीकडे ओबीसी समाजावर अन्याय झाला अशी जी ओरड सुरू झाली होती त्यासाठी राज्य शासनाने इतर मागासवर्गीय सामाजिक शैक्षणिक व आर्थिक स्थिती संदर्भात कारवाई करण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली. त्यामध्ये मंत्री छगन भुजबळ, गणेश नाईक, गुलाबराव पाटील, पंकजा मुंडे, अतुल सावे ▶▶ पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०३ सप्टेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६४.०० क्विंटल | २,४०१ | २,७६१ | २,५८० |
| ज्वारी/हायब्रिड: ८१.०० क्विंटल | १,९०० | २,६५० | २,३१६ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : ४.०० क्विंटल | ६,००० | ६,१०० | ६,०५० |
| उडीद : ४०.०० क्विंटल | ४,००० | ६,६०१ | ५,४५० |
| बाजरी: २१.५० क्विंटल | २,२०० | २,७६५ | २,५१२ |
| मुग: ३३.०० क्विंटल | ४,३०१ | ८,१५० | ५,९६२ |
| सोयाबीन: ०.५० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| हरभरा: ९.०० क्विंटल | ४,६५१ | ५,७७० | ५,३७० |

## अग्रलेख

# तहात हारण्याचा इतिहास मोडीत निघाला

मराठे युद्धात जिंकतात, पण तहात हरतात, असे म्हटले जाते. तथापि, निर्धाराचा कोट केला, तर मराठे तहातही जिंकू शकतात, हे मनोज जरांगे पाटील नावाच्या एका सामान्य माणसाने दाखवून दिले आहे. मराठा आरक्षणाची मागणी नवी नाही. मागच्या अनेक वर्षांपासून जोरकोसपणे या मागणीचा पुकारा होत आहे. याच मागणीकरिता जिल्ह्याजिल्ह्यातून मराठा समाजाचे अभूतपूर्व मोर्चे निघाल्याचे महाराष्ट्रातील जनतेने पाहिले. किंबहुना, या मोर्चा वा आंदोलनास कुठलेही नेतृत्व नव्हते. मात्र, अशाच एका आंदोलनातून मनोज जरांगे यांचे नेतृत्व पुढे आले आणि आता तर मराठा आरक्षणाचे नेते म्हणून जरांगे यांनी मराठ्यांच्या मनात घर केल्याचे दिसते. मागच्या काही वर्षांत जरांगे यांनी अनेक आंदोलने केली. या आंदोलनांमधून जरांगे यांचा झुकेगा नही, हा बाणा दिसून आला. विशेष म्हणजे त्यांच्या प्रत्येक आंदोलनातून मराठ्यांना काही ना काही मिळाल्याचे दिसून आले. आधीच्या आंदोलनामुळे अनेकांना कुणबी प्रमाणपत्रे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. या पार्श्वभूमीवर मुंबईत झालेले आंदोलनही ऐतिहासिक म्हणावे लागेल.

या आंदोलनाची सुरूवात जरांगे यांनी २९ ऑगस्ट रोजी केली. अहिल्यानगर, जुन्नरमार्गे मुंबईत धडकलेल्या मराठ्यांच्या या वादळाने दोन ते तीन दिवसांत अक्षरश: राज्यातील महायुती सरकार हलवले, असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती ठरू नये. मराठ्यांच्या या आंदोलनाचा झंझावात इतका जबरदस्त होता, की इच्छा असूनही सरकारला ते मुंबईत येण्याआधी थोपवता आले नाही. एकतर आरक्षण घेऊ, अन्यथा आपली अंत्ययात्रा निघेल, असाच समस्त मराठा बांधवांचा निर्धार होता. त्यामुळे आधी आंदोलनापासून चार हात दूर राहणाऱ्या सरकारला सरतेशेवटी जरांगे यांच्यापुढे झुकावे लागले. ओबीसीतून मराठ्यांना आरक्षण मिळण्यासाठी हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी करावी, अशी जरांगे यांची मागणी होती. परंतु, सरकार त्याकरिता फारसे अनुकूल दिसत नव्हते. मात्र, ही मागणी राज्य मंत्रिमंडळाच्या उपसमितीच्या बैठकीत मान्य करण्यात आली आहे. हैदराबाद गॅझेटमध्ये मराठा व कुणबी एकच असल्याचे नमूद करण्यात आले आहे. निजामशाहीच्या काळातील हे गॅझेट आहे. निजामाच्या संस्थानात मराठा समाजाला 'हिंदू मराठा' असे संबोधून शिक्षण व नोकरीत आरक्षण जाहीर करण्यात आले असल्याचे अभ्यासक सांगतात. स्वाभाविकच हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी करण्याचा जीआर मराठ्यांसाठी अतिशय महत्त्वाचा म्हटला पाहिजे. याशिवाय सातारा गॅझेटही महिन्याभरात लागू करण्याचा निर्णय होणे, हे दुहेरी यश ठरावे. मराठा व कुणबी एकत्र असल्याचा निर्णय तांत्रिक बाबी तपासून जलदगतीने घेतला असल्याचेही निश्चित करण्यात आले आहे. मराठा व कुणबी एकच असल्याचे मनोज जरांगे पाटील हे सातत्याने सांगत असतात. तेच त्यांच्या आंदोलनाचे मध्यवर्ती सूत्र आहे. हे सूत्र स्वीकारणे, हादेखील मोठा विजय ठरावा. तथापि, तांत्रिक बाजू तपासताना त्यामध्ये काही किंतु, परंतु, तर राहणार नाही ना, ही शंका कायम राहते. मराठ्यांना स्वतंत्र आरक्षण द्यावे. ओबीसीतून आरक्षण देऊ नये, अशी ओबीसींची मागणी आहे. तसे झाल्यास मुंबईत धडकण्याचा इशारा ओबीसी नेते छगन भुजबळ यांच्यासह ओबीसी महासंघाकडून देण्यात आला आहे. त्यामुळे हा मुद्दा अलगदपणेच हाताळावा लागेल आणि तसा तो हाताळला जात असल्याचे दिसते. जरांगे पाटील यांची मागणी सुरूवातीला सरसकट आरक्षणाचीच होती. मात्र, कोर्टाच्या आदेशामुळे त्यात कायदेशीर अडचणी असल्याचे सरकारकडून स्पष्ट करण्यात आले होते. त्यानंतर जरांगे यांनी सरसकटबाबतचा आग्रह सोडला. आता ज्यांना कुणबी असल्याचा पुरावा देता येईल, त्यांना आरक्षण मिळेल. हैदराबाद गॅझेटमुळे हे सुलभ होऊ शकते, याकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष वेधले आहे. या माध्यमातून फडणवीस यांनीही मराठा विऊद्ध ओबीसी या संवेदनशील विषयावर तितक्याच सफाईदार पद्धतीने मार्ग काढला, असे म्हणता येईल. त्यामुळे कालपरवापर्यंत टीकेचे धनी ठरलेले आपले मुख्यमंत्री किती तयारीचे आहेत, हेच अधोरेखित होते.

वास्तविक जरांगे यांचे आंदोलन सरकारवर शेकण्याची चिन्हे निर्माण झाली होती. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजितदादा पवार आंदोलनापासून दूर राहिल्याने मुख्यमंत्री फडणवीस हे एकटे पडल्याचेही चित्र होते. मात्र, असे असताना मुख्यमंत्र्यांनी शांत डोक्याने राधाकृष्ण विखेंना पुढे करून ज्या पद्धतीने सुवर्णमध्य काढला, त्यातून त्यांच्यातील मुत्सद्दीपणाचेच दर्शन घडते. मराठा आरक्षणाच्या आंदोलनासाठी लाखो मराठे कोणतीही भीडभाड न बाळगता रस्त्यावर उतरले. त्यामुळे अनेकांवर केसेसही दाखल झाल्या होत्या. त्यांच्यावरील केसेस मागे घ्याव्यात. तसेच आंदोलनात बलिदान दिलेल्या आंदोलकांच्या वारसांना शासकीय नोकरी मिळावी, यासाठीही जरांगे पाटील आग्रही होते. या दोन्ही मागण्यांवर राज्य सरकारने मान्यतेची मोहोर उमटवली असून, आंदोलकांच्या वाहनांवरील आरटीओचा दंडही माफ करण्यात आला आहे. बहुतांश मागण्या मान्य होणे, ही जरांगे यांच्यासह समस्त मराठा बांधवांची मोठी जीत म्हणावी लागेल. मनोज जरांगे पाटलांनी आरक्षणासाठी आपल्या जीवाची बाजी लावली. मुंबईत अभूतपूर्व आंदोलन केले. या आंदोलनामध्ये निश्चित काही त्रुटी राहिल्या असतील. त्यांच्या काही भूमिका वा विधानांबाबतही मतमतांतरे होऊ शकतील. तथापि, मराठा आरक्षणाबाबतची त्यांची तळमळ व प्रामाणिक भूमिका या आंदोलनातून पुन्हा एकदा ठळकपणे पुढे आल्याचे दिसते. हे बघता या यशस्वी लढ्याबद्दल जरांगे पाटील हे कौतुकासच पात्र ठरतात. मराठ्यांनी अटकेपार झेंडे लावले. मराठे युद्धात जिंकले, पण तहात कायम हरले. जरांगे यांनी मात्र हा इतिहास बदलण्याचा निर्धार प्रत्यक्षात आणला, अशीच सर्वसामान्य मराठा बांधवांची भावना आहे. जरांगे यांचे आंदोलन यशस्वी झाले, यात दुमत असण्याचे काही कारण नाही. परंतु, अंतिमत: मराठ्यांना आरक्षण मिळेल व ते न्यायालयात टिकेल, हे समजण्यासाठी काही काळ वाट पहावीच लागेल.

# निस्वार्थ राजकारण करणारे राजकारणातील भीष्माचार्य माजी आ.साहेबराव दरेकर नाना

**आष्टी मतदार संघाच्या राजकारणात व समाजकारणात गेल्या ४० वर्षांपासून जनतेचे प्रश्न सोडविणारे, आष्टीच्या राजकीय कुरुक्षेत्रातील भीष्मपितामह तथा बीड जिल्ह्याच्या राजकीय पटलावरील निस्वार्थी राजकारण करणारे मोठ्या व्यक्तीं महत्वाचे नेतृत्व मा. आ. श्री. साहेबरावजी दरेकर (नाना) यांचा अभिष्टचिंतन सोहळा मंगळवार दिनांक ३ सप्टेंबर २०२५ रोजी संपन्न होत असून त्यानिमित्ताने त्यांच्या कार्याचा शरद रेडेकर यांनी घेतलेला आढावा.**

बीड जिल्ह्याच्या राजकीय नकाशावर आपल्या आगळ्यावेगळ्या व्यक्तिमत्वाने नावलौकिक निर्माण केलेले राजकीय नेते श्री. साहेबराव दरेकर (नाना) आहेत. बीड जिल्ह्याच्या तमाम जनतेच्या व राजकीय नेत्यांच्या ते परिचयाचे आहेत. नाना आष्टी मतदार संघचं नव्हे तर जिल्हा देखील एक नावाजलेले राजकारणी आहेत.आपल्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक कार्याने त्यांनी बीडच्या राजकीय पटलावर आपली वेगळी ओळख निर्माण केलेली आहे तथा बीडच्या राजकीय नकाशावर आपल्या राजकीय कर्तबगारीने त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केलेले नेते श्री. दरेकर नाना आहेत. त्यांच्या स्पष्टोक्ते पणामुळे ते सर्व दूर परिचयाचे आहेत. मराठवाड्यातील संत - महंतांच्या आणि शुरवीरांच्या भूमीत मा. आ. श्री. साहेबराव दरेकर (नाना) यांच्या रूपाने ही आष्टीची माती पवित्र झाली. संत भगवान बाबा, संत वामन भाऊ, माऊली महाराज, मुकुंदराज स्वामी, प्रभू श्रीराम यांच्या पावन भूमीत राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, धार्मिक आदी क्षेत्रात आपल्या कार्याने या मातीत लहानाचे मोठे होऊन या भूमीच पांग फेडण्याचे काम करणारे नेते श्री. दरेकर नाना आहेत.

आष्टी पासून चाळीस किलोमीटर अंतरावर असणाऱ्या कोयाळ या छोट्याशा गावात स्वातंत्र्य सेनानी स्वर्गीय नाथूजी दरेकर यांच्या कुटुंबात ३ सप्टेंबर १९४७ रोजी म्हणजे देश स्वतंत्र झाल्यावर अगदी काही दिवसात मा. आ. श्री. साहेबराव दरेकर (नाना) यांचा जन्म झाला. शेतकरी आणि सामान्य कुटुंबात लहानाचे मोठे होताना अंगी सामाजिक गुण होते. पुढे शिक्षण पूर्ण करत असतांनाच कोयाळ व परिसरामधील गावातील जनतेच्या सुख - दुःखात सहभागी होणे, त्यांच्या अडीअडचणी सोडवणे हा छंद लहानपणापासूनच असल्याने ते आपोआप राजकारणात ओढले गेले. तेंव्हापासून ते आजपर्यंतचा त्यांचा राजकीय अनुभव आणि इतिहास पाहता ते आष्टी विधानसभा मतदारसंघाच्या राजकारणात नेहमी केंद्रस्थानी असतात. त्यांच्याकडे आष्टीच्या राजकीय कुरुक्षेत्रावरील भीष्मपितामह म्हणून पाहिले जाते.

मा. आ. श्री. साहेबराव दरेकर (नाना) यांची राजकारणाची सुरुवात पिंपळा जिल्हा परिषद गटातून झाली. अशाप्रकारे बीड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राजकारणात त्यांनी यशस्वी प्रवेश केला. कडा सहकारी साखर कारखान्याला बळ देणारा संयम आणि संघर्षातून मा. आ. श्री. भीमराव धोंडे यांच्या खांद्याला खांदा देऊन ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी काम करणारा रांगडा नेता म्हणजे नाना. त्यावेळी मा. आ. भीमराव धोंडे साहेब कारखान्याचे चेअरमन झाले, त्यावेळी



नाना व्हाईस चेअरमन पदावर विराजमान झाले. पुन्हा साधारणपणे १९८५ च्या विधानसभा निवडणुकीत धोंडे साहेबांनी उभे राहण्याचा निर्णय घेतला आणि इथूनच अतिशय जवळच्या दोन्ही मित्रात दोन गट पडले आणि दरेकरांचा खरा संघर्षाचा काळ सुरू झाला. पुढे १९९० च्या विधानसभा निवडणुकीत धोंडे - दरेकर आमने - सामने आले. जनता दलाचे चक्र सुदर्शन चक्र झाले. मात्र दरेकर नानांचा पराभव झाला. नंतर १९९५ ची निवडणूक सुरू झाली. घोडा मैदान समोरच होते. या निवडणुकीत श्री. दरेकर नानांच्या मुलगा - मुलगी चिन्हाने विक्रमी मते घेऊन मराठवाड्यातील क्रमांक एकचे मते घेत संघर्षशील नेता विधानसभेत पोहोचला. त्याच काळात युती सरकार सत्तेवर आले. मात्र श्री. दरेकर नानांची शरद पवार साहेब यांच्यावरची निशचिम भक्तीमुळे श्री. दरेकरांना अपक्ष असून देखील मंत्रिमंडळापासून दूर राहावे लागले. मात्र त्यावेळी आ. श्री. दरेकर नाना यांनी मतदारसंघातील अनेक साठवण तलाव, बीड - अमळनेर नगर राज्य मार्ग, आयटीआय कॉलेज यांसह अनेक छोटे - मोठे विकास कामे मार्गी लावून मतदार संघात शांतता अबाधित ठेवण्यासाठी प्रयत्न केले.

पुढे मित्र स्वर्गीय रामचंद्र दादा धस यांचे चिरंजीव श्री. सुरेश आण्णा धस यांना राजकारणात मनमोकळ्या पणाने कुठलाही हातचा न ठेवता मदत केली. १९९७ च्या जि. प. निवडणुकीत श्री. सुरेश आण्णा धस या युवा नेतृत्वाचा राजकीय उदय झाला आणि त्यांना दरेकरांनी जि. प. अध्यक्षपदासाठी मदत केली. पुढे १९९९ च्या विधानसभेच्या निवडणुकीत आपले राजकीय शिष्य असणाऱ्या आ. श्री. सुरेश आण्णा धस यांच्याकडून दरेकरांना पराभूत व्हावे लागले. नंतर २००४ च्या विधानसभा निवडणुकीत ज्येष्ठ चिरंजीव श्री. राजाभाऊ दरेकर यांना उभे केले, मात्र तेथे अपयश आले.

श्री. दरेकरांच्या राजकीय जीवनात अनेक चढउतार आले. मात्र पिंपळा सध्याच्या लोणी जिल्हा परिषद गटातील जनतेने मात्र श्री. दरेकर कुटुंबावर नेहमीच भरभरून प्रेम केले आहे. पुढे पुन्हा २००९ च्या विधानसभा निवडणुकीत दरेकरांनी आ. श्री. सुरेश धस यांना मदत केली तेथे त्यांचा विजय झाला. मात्र येथे एकत्र असलेली थ्रीडी जास्त काळ एकत्र राहिली नाही. पुन्हा २०१४ च्या निवडणुकीत आ. श्री. भीमराव धोंडे यांना आमदार करण्यासाठी मदतीचा हात दिला आणि ते आमदार झाले. पुढे २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत श्री. बाळासाहेब आजबे राष्ट्रवादीकडून एकाएकी लढत असतांना मा. आ. श्री. साहेबराव दरेकर यांनी त्यांना मदत करण्याचा निर्णय घेऊन राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि श्री. बाळासाहेब आजबे आमदार झाले.

एकूणच आष्टी मतदार संघाच्या राजकीय इतिहासात मा. आ. श्री. साहेबराव दरेकर (नाना) यांनी आमदार होण्यासाठी मदत केली नाही असा सध्या तरी एकही नेता नाही. आजच्या बदलत्या राजकीय परिस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. शरद पवार साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून त्यांच्याबरोबर निष्ठेने कायम राहणार असल्याचे ठामपणे सांगितले आणि पक्ष विस्तार करण्यासाठी प्रत्यक्ष सुरुवात केली. दिलेला शब्द पाळणे, जे बोलायचे ते तोंडावर बोलणे, स्वाभिमानी बाणा आणि संघर्ष करण्याची तयारी असणारे व आजच्या मतदारसंघातील जनतेच्या सुखदुःखात सहभागी होणारे बीड जिल्ह्यात सर्वत्र परिचित असणारे आष्टी मतदार संघाचे भीष्मपितामह ज्येष्ठ पण सर्वश्रेष्ठ नेते मा. आ. साहेबराव दरेकर नाना.

चंदन स्वतः झिजत राहते आणि दुसऱ्याला शितलता देते तसे नानांचे जीवन आहे. जगद्गुरु संत तुकारामांच्या विचारांचा प्रभाव नानांच्या बोलण्यात नेहमीच जाणवतो. त्यांच्या स्वभावाला धार्मिक अधिष्ठान आहे. समाजातील रुढी - परंपरा, सण - उत्सव याला बाधा न पोहोचू देता ते अंधश्रद्धेला विरोध करतांना दिसतात. लग्न समारंभातील बडेजाव पणा, पूजाअर्चा, वृत्त - वैकल्य यामध्ये समाजाने गुंतून न पडता, व्यर्थ खर्च न करता आपल्या कुटुंबाची उन्नती करावी असे नेहमी त्यांना वाटते. शेतकऱ्यांचा पिंड असलेले, शेतकऱ्यांबद्दल त्यांना नेहमीच कळकळ वाटते. शेतकऱ्यांच्या मुलांनी शिकावं, मोठं व्हावं, नावलौकिक करावा याबाबत नाना नेहमीच आशावादी राहिले. नाना नेहमी वधूवरांना लग्नसमारंभात शुभाशीर्वाद देतांना तरुणांना वडीलकीचा सल्ला दिल्याशिवाय राहत नाहीत. नाना आमदार असतांना त्यांच्या काळात झालेले रस्ते, पाझर तलाव, नाले, पूल आजही नानांच्या दूरदृष्टीची साथ देतात. सत्तेत असो अथवा नसो, पदावर असो अथवा नसो परंतु समाजकारण करतांना त्यांनी विधानसभा मतदारसंघात नेहमीच आपला धबधबा कायम टिकून ठेवला आहे. गोरगरीब मजूर, पीडित - शोषित सर्वांचा आधार म्हणजे नाना. कुणाची भीडभाड न ठेवणारे, परखड बोलणं, बोलण्यातील लकप, चालण्यातील रुबाब, स्वभावातील रांगडेपणा नेहमीच भावत गेला. नानांशी बोलण्यावर आपलेपणाची भावना मनातून निर्माण होते. नानांचा संपर्क आला की, नाना त्यांना आपलंसं करतात. नेहमी दिलखुलास असणारे नाना, आपलेपणाची विचारपूस करणारे नाना, दरेकर नाना परखड राजकारणी. आष्टी मतदारसंघातच नव्हे तर महाराष्ट्र राज्य सुद्धा त्यांना '' नाना '' म्हणूनच ओळखतो. अशा या सर्व गुणसंपन्न बीड जिल्ह्याच्या राजकारणात आष्टी मतदार संघाचा इतिहास आहे नाना विधानसभा निवडणुकीत ज्या उमेदवारांच्या बाजूने राहतात त्याला गुलालचं लागला आहे. भीष्मपितामह मा. आ. श्री. साहेबराव दरेकर नाना यांना वाढदिवसानिमित्त दीर्घायुष्यासाठी अनंत शुभेच्छा...!!!

**शरद रेडेकर**
**मो.९४२१०००७९९**

## पान ६ वरून...

### सुगाव येथील मराठासेवक

संदर्भात केंद्र व राज्य सरकारची नकारात्मक भूमिका यामुळे लवकर तोडगा निघत नसल्याने व आमरण उपोषणामुळे दिवसेंदिवस मनोजदादा यांची प्रकृती ढासळत चालली असल्याचे टि.व्ही वर पाहून त्यांना अतिशय दु:ख झाले. तसेच सातत्याने सोशल मीडियाच्या माध्यमातून मिळत असलेली माहिती ऐकून त्यातून आलेल्या नैराश्यातून नितीन चव्हाण यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शनिवार, दिनांक ३० ऑगस्ट रोजी घडली. नितीन चव्हाण या तरूणाने मराठा आरक्षण आंदोलनाच्या समर्थनार्थ राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. तशा आशयाच्या पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाल्या आहेत. रविवारी चव्हाण यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात व हजारो जनसमुदायाच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते

--------

### बीड ते परळी रेल्वे

मुख्य अभियंता प्रशांत भेगडे आदी उपस्थित होते. तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी बैठकीत सहभाग घेतला. उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, बीड ते परळी वैजनाथ रेल्वे मार्गाच्या भूसंपादनाचे प्रलंबित प्रकरणे बीड जिल्हा प्रशासनाने तातडीने निकाली काढून आवश्यक जमीन उपलब्ध करून द्यावी. या रेल्वे मार्गासाठी राज्य शासनाच्या हिस्स्याची रक्कम तातडीने अदा करण्यात यावी. अर्थसंकल्पात मंजूर १५० कोटी रुपये देण्यात यावे. उर्वरित १५० कोटी रुपयांची तरतूद करावी. रेल्वेने आतापर्यंत दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करावी. फलटण ते लोणंद या रेल्वे मार्गावरील प्रलंबित कामे पूर्ण करावीत. बारामती रेल्वे स्थानकाच्या कामाला रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेटी द्याव्या. तसेच कामाला गती देऊन पुढील काळात सुसज्ज रेल्वे स्थानक प्रवाशांच्या सेवेसाठी उपलब्ध करून द्यावे, असे निर्देशही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी दिले.

------------

### बीडमध्ये बालरंगभूमी

म्हणून बीडमध्ये हा सामूहिक अथर्वशीर्ष पठणाचा उपक्रम आयोजित केला गेला आहे. या उपक्रमात अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन बीड नाट्य परिषदेचे अध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर यांच्यासह बीड बालरंगभूमी परिषदेचे पदाधिकारी संजय पाटील देवळाणकर, स्नेहल पाठक, अनुराधा चिंचोलकर, विलास सोनवणे, दीपक जमदाडे, दुष्यंता रामटेके, मिलिंद शिवनीकर, नामदेव साळुंखे, अमित गाडे, बाबासाहेब कांबळे, राहुल सोनवणे, सुरेश थोरात, सुरेश साळुंखे, सिद्धार्थ अग्रवाल, विजयकुमार राख, असलम शेख, रोहित पुराणीक व दीपक गिरी यांनी केले आहे.

-----------

### डीजे बंदी विरोधात अंबाजोगाईत

प्रविण कराड या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, आम्ही स्वच्छ, मर्यादित वाजणारा साऊंड वापरून व्यवसाय करतो. मात्र पोलिस प्रशासनाने कोणती ही शिस्तबद्ध तडजोड न करता थेट बंदी घातल्याने आम्हाला हा कठोर निर्णय घ्यावा लागला आहे. त्यांनी पुढे सांगितले की, डीजेचा वापर पूर्णतः बंद असला तरी आमचा व्यवसाय साऊंड, लाईट, मंडप व जनरेटर यावर अवलंबून आहे. प्रशासनाकडून बंदी कायम राहिली तर ज्यांची उपजीविका या व्यवसायावर अवलंबून आहे असे शेकडो ऑपरेटर, वायरमन, ड्रायव्हर, साऊंड इंजिनिअर यांच्यासह अनेक तंत्?

----------

### परळीतील चिमुरडीवर

नये. अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. सदरील निवेदनावर निवेदक कॉ.बब्रुवाहन पोटभरे, विनोद शिंदे, शेख बाबा, पप्पु आदमाने, शेख शफिक, अमोल गणपत माने, प्रेम माने, विशाल पोटभरे, सचिन गालफाडे, हनिफ पठाण, लोनू गोडबोले, रवि आवाडे, अशोक पालके आदींसह इतरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

-----------

### बाबुराव पवारांचे

आहे. डी.एड. झाल्यानंतर बाबू पवार यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात प्रगतीची गरुड झेप घेतली ती इतरांसाठी मार्गदर्शक आहे आता सरांनी समाजाची सेवा करावी असेही ते म्हणाले. या प्रसंगी पवार यांचा सपत्निक सत्कार विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आणि संघटनांनी केला. विचार मंचावर शिक्षक परिषदेचे राजेश सुर्वे, माजी प्राचार्य कुं.पी.इंगळे,बाबुराव गाडेकर, प्रकाश चतरकर,प्रशासकीय अधिकारी एन के देशमुख, दैनिक आरंभ चे अशोक वाघमारे, भारत मडके इत्यादींची उपस्थिती होती. याप्रसंगी राजेश सुर्वे, अरुण जाधव,प्रेरणा लोंढे यांची समायोजित भाषणे झाली. माझ्या जीवनाचा शिल्पकार माझा संपूर्ण परिवार आहे तर सहकाऱ्यांनी देखील मला समजून घेऊन विशेष सहकार्य आणि मार्गदर्शन केले आहे. मला पुढेही ज्येष्ठांचे मार्गदर्शन आवश्यक आहे. ज्यांनी ज्यांनी मला सहकार्य केले त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे, असे भाऊक उद्गार श्री बाबू पवार यांनी सत्काराला उत्तर देताना काढले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रंगनाथ खेडेकर यांनी केले.प्रास्ताविक मंगेश जैवळ तर आभार प्रदर्शन आबासाहेब मुळे यांनी केले.कार्यक्रमास मोठ्या संख्येने विविध क्षेत्रातील मान्यवर ग्रामस्थ, उपस्थितहोते. सहभोजनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

-------------

### सचिन शिंदे अर्थशास्त्र

घेऊन बीए अभ्यासक्रमामध्ये प्रथम श्रेणीने पदवी परीक्षा उत्तीर्ण झाला.

पदव्युत्तर पदवीसाठी त्याने अर्थशास्त्र विषय घेऊन ग्रेट ए मध्ये त्याने पदव्युत्तर पदवी मिळवली. त्यानंतर पुढे सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे यांच्या वतीने आयोजित महाराष्ट्र राज्य पात्रता परीक्षा मध्ये सहाय्यक प्राध्यापक पदासाठी आवश्यक असणाऱ्या सेट परीक्षेचाही त्याने अभ्यास केला व अर्थशास्त्र विषयात पहिल्या पेपर मध्ये ६२ तर दुसऱ्या पेपर मध्ये १०२ गुण (कट ऑफ पेक्षा जास्त गुण) घेऊन चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाला. यासोबतच सध्या तो स्पर्धा परीक्षा देण्यासाठी एमपीएससी व यूपीएससीचाही अभ्यास करत आहे. सचिनचा अर्थशास्त्र विषयांमध्ये सखोल अभ्यासातून तो मागील अनेक वर्षांपासून अर्थशास्त्रीय घडामोडी वरती लक्ष ठेवून त्यावरती मांडणी करत आहे. तसेच राज्यातील नामांकित असलेल्या लोकसत्ता या वृत्तपत्रात देखील त्यांच्या मागणीवरून तो लेख पाठवत असतो जे की महाराष्ट्रभर प्रसारित होत असतात आणि यामुळे देखील तो एक अभ्यासू लेखक असल्याचे सर्व स्तरातून कौतुक होत असते.सचिनच्या या यशाबद्दल ग्रामस्थ, परिवार, मित्र, व मार्गदर्शक व्यक्तिमत्व कडून त्याच्यावरती सर्व स्तरातून शुभेच्छांच्या वर्षावा सह कौतुक होत आहे. त्याने घेतलेली यशाची उंच भरारी नक्कीच इतर विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे.

----------

## पान १ वरून...

### आंदोलन करणं

असं आवाहन छगन भुजबळ यांनी केलं आहे. ओबीसी समाजाने आक्रमक आंदोलन करु नये, असं आवाहन छगन भुजबळ यांनी केलं आहे. राज्य सरकारच्या जीआरमधील काही शब्दांवरुन संभ्रम निर्माण झाला आहे. याबाबत अभ्यासकांसोबत आपली चर्चा सुरु आहे. तसेच या जीआर विरोधात आपण मुंबई हायकोर्टात याचिका दाखल करणार आहोत. त्यामुळे या विरोधात कुणीही रस्त्यावर येऊन आंदोलन करु नये, असं आवाहन छगन भुजबळ यांनी केलं आहे.''ओबीसी आणि मागासवर्गातील आमच्या अनेक संघटना, आमचे नेते यांनी राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी, कुठे कलेक्टर किंवा इतर ठिकाणी निवेदनं दिली. काही ठिकाणी मोर्चे काढत आहेत. अनेक ठिकाणी शासन निर्णय फाडत आहेत. हे सगळं सुरु आहे. मी आपले इतर ओबीसींचे जे नेते आहेत, त्यांच्याशी सुद्धा चर्चा केली. आपल्याला कल्पना आहे की, आता गणेशोत्सव सुरु आहे. दोन दिवसांत विसर्जन वगैरे सुरु होणार आहे. अनेकांच्या घरी गणपती असतात. अनेक कार्यकर्ते या कार्यक्रमात असतात. काही ठिकाणी ओबीसींचे कार्यकर्ते आणि नेत्यांचे उपोषण देखील सुरु आहे'', असं छगन भुजबळ म्हणाले.''माझी या सर्वांना विनंती आहे, आम्ही सर्वजण येथे अनेक जे कायदेतज्ज्ञ आहेत, वकील आहेत, त्यांना हे सर्व कागदपत्रे देऊन या संदर्भात जे काही संभ्रम आहे, त्याबद्दल त्यांची मते जाणून घेत आहोत. माहिती घेत आहोत. आवश्यक असेल तर निश्चितपणे त्यांच्याशी चर्चा करुन कदाचित सोमवार-मंगळवारपर्यंत हायकोर्टात जाण्याची सुद्धा आमची तयारी आहे. पण त्या संदर्भात आपल्याला अनेक कागदपत्रांची जुळवाजुळव करण्याची आवश्यकता भासते. आम्ही सर्वजण मुंबईत वेगवेगळ्या कायदेतज्ज्ञांशी चर्चा करत आहोत असंही भुजबळ म्हणाले.

---------------

### नमोच्या सातव्या हप्त्यासाठी

नमोच्या हप्त्याची राज्यातील ९४ लाख शेतकरी प्रतिक्षा करत होते. तसेच योजना बंद झाली, या अफवेने जोर धरला होता. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. परंतु आता मात्र राज्य सरकारने या संदर्भात शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना नमोचा हप्ता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

------------

### भूमिका स्पष्ट करा, उच्च न्यायालयाचे

तोंडी माहिती न देता प्रतिज्ञा पत्र सादर करण्यास सांगितले आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी चार आठवड्यांनंतर होईल. मनोज जरांगे यांनी २९ ऑगस्ट रोजी आझाद मैदानावर उपोषण सुरू केले. यामध्ये लाखो आंदोलक सहभागी झाले होते. दरम्यान मुंबईत वाहतूक कोंडी, रस्ते अडवणे, सार्वजनिक सुविधांचे नुकसान आणि पोलिसांवर हल्ले झाल्याचे आरोप आहेत. यामुळे मुंबईकरांना वेठीस धरले गेले, याबाबत स्थानिक नागरिक आणि व्यवसायिकांमध्ये नाराजी व्यक्त झाली. आंदोलन संपल्यानंतरही, याचिकाकर्त्यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकांमध्ये हे नुकसान भरपाईची मागणी केली आहे. याचिकाकर्त्यांनी सांगितले की, जरांगे यांनी चिथावणी दिल्याने लाखो लोक मुंबईत दाखल झाले. यामुळे शहर ठप्प झाले. मात्र, आयोजकांच्या वतीने न्यायालयात सांगितले की, ''आंदोलनाच्या पहिल्या दिवसापासून मनोज जरांगे यांनी कोणतीही चिथावणीखोर भाषणे दिली नाहीत. आंदोलन शांतिपूर्ण होते.'' तरीही, न्यायालयाने हे स्वीकारले नाही आणि तोंडी स्पष्टीकरण पुरेसे नसल्याचे सांगितले. आंदोलन संपल्याने याचिका प्रलंबित ठेवण्यात अर्थ नाही, पण प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करा, असे खंडपीठाने नमूद केले. नुकसानीची जबाबदारी नाकारली तर फोटो आणि पुराव्यांसह स्पष्टीकरण द्यावे लागेल.

------------

### ओबीसी उपसमितीच्या

चंद्रशेखर बावनकुळे असतील. तर छगन भुजबळ, गणेश नाईक, गुलाबराव पाटील, संजय राठोड, पंकजा मुंडे, अतुल सावे, दत्तात्रय भरणे असे सदस्य असतील, अशी माहिती विश्वसनीय सुत्रांनी दिली. ओबीसींसाठी स्वतंत्र मंत्रिमंडळ उपसमितीमध्ये भाजपचे ४, शिवसेनेचे २, राष्ट्रवादीचे २ सदस्य अहेत. ही उपसमिती ओबीसींच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थितीबाबत कार्यक्रम, योजनांबाबत ही समिती कामकाज करणार आहे.

------------

### परळीत दहा लाखाचा

२३ हजार ६८० रुपयाच्या मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी वाशिम उर्फ शराबी आक्रम बेग यांच्याविरुद्ध पोलीस ठाणे संभाजीनगर येथे एन. डी. पी. एस. १९८५ चे कलम ८(क), २०, २२ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे, पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे, रघुनाथ नाचणवार ,पोलीस उपनिरीक्षक अनिल शिंदे, रियाज शेख, पवार, सहाय्यक फौजदार थळकरी, सौदनकर, पठाण, गुट्टे, गायकवाड , गीते , पाचपांडे ,तांदळे, चव्हाण, घोडके, चव्हाण, डोंबरे, पवार, घुगे, धुमाळ, डोरनाळे, येरडलावार, मोरे, मतीन, मुंडे,सरवदे, मुजमुले, दराडे, जाधव, गुट्टे, भताने, जाधव, सोडगीर, केदार, ढोले, क्षीरसागर, मिसाळ, तोटेवार, धनवडे, अन्नमवार, गायसमुद्रे, वडमारे, चाटे, वाघमारे आदींनी केली.

------------

### आरक्षणाच्या संरक्षणासाठी

होत असलेली घुसखोरी थांबविण्यात यावी याकरिता ओबीसी समाज बांधवांनी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांच्या नेतृत्वाखाली आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी बीड यांना सादर केले आहे. याबाबत जिल्हाधिकारी बीड यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भारतीय राज्यघटनेने सामाजिक, आर्थिक दृष्ट्या पिडीत, वंचीत घटकांना आरक्षणाची तरतुद केली. ही करत असतांना घटनात्मकदृष्ट्या नेमलेल्या आयोगांच्या सर्वेक्षण आणि घटनात्मक तरतुदीनुसार समाजाच्या मुख्य प्रवाहापासून कोसो दूर असलेल्या घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मंडल आयोगाच्या तरतुदीनूसार इतर मागासवर्गीय घटकातील १२ बलुतेदार १८ अलुतेदार, दुर्बल, वंचीत, पिडीत व मागास घटकातील हजारो जातींना ओबीसी या प्रवर्गात समाविष्ट करण्यात आले. त्यामुळे सरकारने दबावाखाली न घेता घटनात्मक बाबीचा विचार करून ओबीसीमध्ये मराठा समाजाची होत असलेली घुसखोरी थांबवावी. अन्यथा ओबीसी प्रवर्गात अत्यंत अस्वस्थता आहे. जर आपण ओबीसीवर अन्याय केला तर ओबीसी प्रवर्ग सुद्धा रस्त्यावर उतरल्या शिवाय राहणार नाही याची नोंद घेवून ओबीसीच्या भावना समजून ओबीसी प्रवर्गात मराठा समाजाचा शिरकाव होण्यापासून रोखा, अन्यथा यामुळे अस्वस्थ ओबीसी समाज तीव्र आंदोलनाचा मार्ग अवलंबेल व त्यानंतर होणाऱ्या परिणामाची जबाबदारी शासनाधी असेल याची नोंद घ्यावी.

याप्रसंगी परीट समाजाचे प्रदेशाध्यक्ष गणेश जगताप, बंजारा समाजाचे नेते प्रा. पी. टी. चव्हाण, वंजारी कर्मचारी महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष मोहन आघाव, ऑल इंडिया मुस्लिम ऑर्गनायझेशनचे बीड जिल्हाध्यक्ष प्रा. रफिक बागवान, माळी महासंघाचे नेते प्रा. लक्ष्मण गुंजाळ, सोनार समाजाचे ॲड. संदीप बेद्रे, सेवालाल सेनेचे संस्थापक अध्यक्ष बी. एम. पवार, वंजारी समाजाचे नेते माऊली शिरसट, केशव तांदळे, धनगर समाजाच्या नेत्या श्रीमती मीनाक्षीताई देवकते, श्रीमती मयुरी बांगर, श्रीमती संजीवनी राऊत, सुतार समाजाच्या किस्किंदाताई पांचाळ, समता परिषदेचे बीड शहराध्यक्ष निखिल शिंदे, युवा नेते नितीन राऊत, राजू महूवाले, शुभम राऊत, सावता काळे, दत्तात्रय गोंदणे, अजय राऊत, संतोष रासवे, माळी महासंघाचे धनंजय काळे, कान्हा मेत्रे, मंगेश जमदाडे, गणेश काळे, उत्तरेश्वर शेलार, अनिकेत जिरे, महेश राऊत, राहुल राऊत, कृष्णा राऊत, पिंकू कदम, अंकुश कदम, नवनाथ कदम, निखिल ढोरमारे, हर्षद राऊत, भागवत राऊत, शंकर राऊत, प्रकाश राऊत, उमेश साळुंखे, कुमार शिंदे, राणा गोरे, प्रदीप उगलमुगले, विलास राठोड, धनंजय रोकडे, हनुमान ढाकणे, दत्ता वाघ, अजय ढाकणे, केशव तांदळे, कानिफनाथ विघ्ने, दिनेश शेप, गोपाळ शिंगारे, जगन्नाथ खेत्री, ऋषिकेश रासवे, चक्रधर हिवरकर, शशी पुरी, दीपक राख, अशोक जाधव, सुमंत राऊत, संभाजी राऊत, नारायण साळुंखे, जालिंदर राऊत, नवनाथ कदम, प्रकाश राऊत, श्रीमती चंद्रकला बांगर, श्रीमती सुमन कटोर, श्रीमती उषा चव्हाण, श्रीमती जया राऊत, श्रीमती सुरेखा बिडवे, श्रीमती संगीता डोंबरे, श्रीमती रेखा शिंदे, श्रीमती साधना शिंदे, श्रीमती मनीषा ठोंबरे यांच्यासह ओबीसी समाजाचे प्रतिनिधित्व करणारे शेकडो ओबीसी बांधव, भगिनी, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**हैद्राबाद गॅझेटियर शासन परिपत्रकाची होळी!**

यावेळी उपस्थित ओबीसी बंधू-भगिनीने गगनभेदी घोषणा देत जिल्हाधिकारी कार्यालय दुमदुमून सोडले होते. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हैद्राबाद गॅझेटियर शासन परिपत्रकाची होळी ओबीसी बांधवांनी केली. शासनाने ओबीसी समाजाच्या भावना समजून घेऊन तात्काळ सदरील शासन परिपत्रक रद्द करावे अन्यथा यापुढे ओबीसीचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ साहेब यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन करण्यात येऊन वेळ पडल्यास मुंबई देखील जाम करण्यात येईल असा इशारा समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांनी यावेळी दिला.

------------------------

### भुजबळ यांचा मंत्रिमंडळ

तसेच पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल उपस्थित होते. महायुती सरकारमध्ये मंत्री भुजबळ यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य अडचणींचा आढावा घेण्यासाठी ही बैठक घेण्यात आल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले. पक्षाच्या प्री-कॅबिनेट बैठकीत छगन भुजबळ यांनी ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर उघडपणे नाराजी व्यक्त केली होती. ओबीसी समाजावर अन्याय होत असल्याचा त्यांचा ठाम आरोप असून याबाबत वरिष्ठ पातळीवर गंभीर चर्चेची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते.

---------------

### पुणे-लोणावळा चौपदरीकरणास

विभागाच्या निर्णयानुसार संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेंतर्गत दिव्यांगांच्या अर्थसहाय्यात १ हजार रुपयांची वाढ करण्यात आली असून लाभार्थ्यांना दरमहा अडीच हजार रुपये मिळणार आहेत. तसेच मुंबई ठाणे नव्या मेट्रो मार्गिकेला मान्यता, मुंबई लोकल खरेदी, पुणे लोणावळा तिस-या चौथ्या मार्गिकेच्या प्रकल्प खर्चाची तरतूद असे अनेक निर्णय घेण्यात आले.

-----------

### देव बाप्पा! सरकारने कोपराला

आणि दत्तात्रय भरणे यांसह सचिव म्हणून त्या विभागाचे सचिव यांची समिती स्थापन केली आहे. जर ओबीसी आरक्षणाला धक्का लागत नसेल तर समिती स्थापन करण्यामागचा उद्देश काय.? दुसरीकडे मराठा समाजाला आरक्षण देताना सर्व बाजू तपासूनच शासन आदेश काढलेला असावा परंतु यामध्ये अनेक मत मतांतरे अभ्यासक आणि घटना तज्ञ व्यक्त करत असल्यामुळे दोन्ही समाजाला खुश करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने कोपराला गुळ तर लावला नाही ना अशी चर्चा मात्र होत आहे. उपोषण मागे घेताना मनोज जरांगे आता पुन्हा आपली फसगत होऊ नये असे झाले तर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या दारात येऊन बसेल असाही इशारा दिला. मात्र आंदोलकांनी गुलाल उधळून आनंद उत्सव साजरा करत परतीचा मार्ग स्वीकारला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मंत्रिमंडळाच्या बैठकीला ओबीसी नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी दांडी मारली म्हणजेच त्यांची नाराजी यातून दिसून आली. त्यामुळे ओबीसी या निर्णयावर समाधानी नसल्याचे दिसते. सरकारने मराठा असो की ओबीसी असो या दोन्ही समाजाला काय ते स्पष्ट सांगितलेच नसल्याचे बोलले जात आहे. शासन आदेश तळागाळातील मराठा समाजाला अजूनही समजलेला दिसत नाही. ज्यांना समजला त्यांनी आपली मते व्यक्त केली, त्यामुळे मराठा समाजाचे आरक्षण टिकणारे आहे असे काहींचे मत आहे आणि त्यामुळेच ओबीसी समाज आंदोलनाच्या पावित्र्यात उतरल्याचे दिसत आहे. हे पेचं सरकार पुढील कमी झाला आणि दुसरा पेच निर्माण झाला यातून आता सरकार मार्ग कसा काढणार हा काळच ठरवेल. असो, गणपती बाप्पा आपण चतुर, हुशार, बुद्धिमान आहात. आपल्याला अनेक नावे आहेत ती नावे उगाचच नाहीत प्रत्येक प्रसंगासाठी एक नाव आहेच म्हणावे लागेल. मग आता देवबाप्पा, हा पेच कसा सुटला जाणार यावर आता आपणच मार्ग काढावा, अशी दोन्ही समाजातील गणेश भक्तांची ईच्छा आहे आणि तुम्ही याचा नक्कीच विचार कराल. सर्व समाज पुन्हा एकमेकाविषयीचा द्वेष बाजूला ठेवून केवळ आपले भक्त म्हणून राहतील असा काही आनंददायी निर्णय व्हावा हीच अपेक्षा. देवबाप्पा, आजपर्यंत अनेक विषय आपल्या कानी घातले आता आणखी मोठा विषय आहे तो पुढच्यावेळी तुमच्याशी बोलू आणि सांगू.

-------------

cmyk

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. ०४ सप्टेंबर २०२५ | ३

## थोडक्यात...



आष्टी-पाटोदा-शिरूर मतदार संघाचे माजी आमदार,मार्गदर्शक,श्रद्धास्थान श्री.साहेबरावजी दरेकर नानांना स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालय मुगगाव ता.पाटोदा यांच्या वतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.



सुप्रभात ग्रुपचे सदस्य यांनी व माजी जि प सदस्य सतीश आबा शिंदे यांनी साहेबराव दरेकर नाना यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करताना.. छाया शरद रेडेकर

## महालक्ष्मी पुजन प्रसंगी धानोरा येथील भजनी मंडळी



कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील धानोरा येथे आजिनाथ लक्ष्मण गडकर यांच्या निवास्थानी महालक्ष्ण पुजा निमीत भजन करत असतानी धानोरा येथील संत बाळूदेव महाराज भजनी मंडळी रामदास माळी महाराज सोबत भिमराव शिंदे,सतिष काळे,आशोक गाडे महाराज,सौ.इंदूबाई गुंड,मालबाई होळकर,मंगलबाई होळकर, मृदंग वादक आकाश साबळे दिसत आहेत.

## सर्वंकष लढ्याशिवाय हक्काचे पाणी मिळणार नाही - कॉ. राजन क्षीरसागर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

समन्यायी पाणीवाटप हा मराठवाड्याचा अस्तित्वाचा प्रश्न असून रक्तायेवढे महत्त्व आपण पाण्याला दिले पाहिजे. समान पाणी वाटप झाले नाही तर अनेक पिढ्या दुष्काळात होरपळतील असे प्रतिपादन कॉ. राजन क्षीरसागर यांनी केले. योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित व योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी आयोजित श्री गणेश व्याख्यानमालेत पाचवे पुष्प गुंफताना त्यांनी 'मराठवाड्यातील सिंचन आणि विकास - संधी व आव्हाने' या विषयावर आपले विचार मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक मा.सय्यद पाशू गुरुजी होते. राजन क्षीरसागर पुढे म्हणाले की, शासनाचे चुकीचे धोरण व कारस्थान यामुळे मराठवाड्याला विकासापासून वंचित ठेऊन गुलामगिरीचे जीवन जगण्यास भाग पाडले जात आहे. धरणाच्या पाण्याचे योग्य नियमन करून समान पाणी वाटप केले पाहिजे व कंत्राटदार जगवणे थांबवले पाहिजे. राजकारण्यांनी देव व धर्माच्या नावावर मत मागायचे थांबवून कृष्णा खोऱ्याचे पाणी मराठवाड्याला द्यावे. राजर्षी शाहू महाराज व अहिल्याबाई होळकर यांनी त्यांच्या काळात पाण्यासाठी केलेल्या कार्याचा आदर्श घेऊन सामुदायिक शहाणपणावर पाणीवाटप करावे. सध्याचा विकासाचा मार्ग चुकीचा असून विसंगित विकास हा धोक्याचा इशारा आहे. नशेबाज राजकारणासाठी पाणी न वापरता गावखेड्याच्या विकासासाठी ते वापरले पाहिजे. समृद्धी, शक्तिपीठ प्रकल्पातील मार्गात येणारे अनेक कालवे नष्ट केले जात आहेत. स्मार्ट सिटीसाठी ग्रामीण भागातील पाणी व वाळू मोठ्या प्रमाणावर वापरत आहेत. हे थांबवून संतुलित विकास केला पाहिजे. येत्या काळात पाणी हे आंतरराष्ट्रीय युद्धाचे कारण ठरणार आहे असेही त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रमेश सोनवळकर

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सेवा पंधरवाडा प्रभावीपणे राबवा -विभागीय आयुक्त पापळकर

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

**जनतेच्या दैनंदिन अडचणींना वेगवान दिलासा देण्यासाठी महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, गतिमान व पारदर्शक होणे गरजेचे आहे. या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन (१७ सप्टेंबर) ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती (२ ऑक्टोबर) या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत ''सेवा पंधरवाडा'' राबविला जाणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत ''सेवा पंधरवाडा'' प्रभावीपणे राबवा असे निर्देश आज विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले.**



विभागीय आयुक्त कार्यालयात अभियानाचे नियोजन व प्रभावी अंमलबजावणीसाठी विभागीय आयुक्त श्री. पापळकर यांच्या अध्यक्षतेखाली आज बैठक झाली. या बैठकीस दूरदृश्य प्रणालीद्वारे विभागातील सर्व जिल्हाधिकारी सहभागी झाले, तर बैठकस्थळी अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

लोकप्रतिनिधी व जनसहभाग महत्त्वाचा

अभियानात जनसहभाग व्हावा यासाठी स्थानिक खासदार, आमदार, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत सदस्यांना सक्रियपणे सहभागी करून घेण्याचे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले. तसेच जिल्हाधिकारी यांनी या अभियानाला व्यापक प्रसिद्धी द्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव

अभियानात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारींकडून सन्मान करण्यात येईल, असेही श्री. पापळकर यांनी सांगितले.

श्री.पापळकर म्हणाले, ''राष्ट्रपिता महात्मा गांधी व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्मरणदिनांचे औचित्य साधून सुरू होणाऱ्या या अभियानात सर्वांचा सहभाग महत्त्वाचा आहे. हा अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्वांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी.''

अभियानाचे तीन टप्पे

पहिला टप्पा (१७ ते २२ सप्टेंबर) पाणंद रस्ते मोहिम, पाणंद व शिवरस्त्यांना क्रमांक देणे, गाव नकाशांवर रस्ते चिन्हांकित करणे,नोंद नसलेल्या रस्त्यांची नोंद घेणे, शेतावर जाण्यासाठी संमतीपत्र घेणे, रस्ता अदालत आयोजित करून प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे, शेतरस्त्यांची मोजणी व सीमांकन करणे.

दुसरा टप्पा (२३ ते २७ सप्टेंबर) ''सर्वांसाठी घरे'' शासकीय जमिनी लाभार्थ्यांना पट्टे वाटप करणे, अतिक्रमणे नियमबद्ध करून वैध करणे, विकास आराखड्याशी सुसंगत गायरान जमिनींचा उपयोग, खाजगी मिळकतधारकांना पट्टे वाटप करणे. तिसरा टप्पा (२८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर) नाविन्यपूर्ण उपक्रम, स्थानिक गरजा व भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन जिल्हाधिकारी स्वतः उपक्रम आखणार आहेत. विभागातील सर्व तलाठी, मंडळ अधिकारी तहसीलदार उपविभागीय अधिकारी , उपस्थित होते. यावेळी कृत्रिम वाळूचा वापर करण्याकरीता शासनाने ठरविलेल्या धोरणाबाबतही आढावा घेण्यात आला. नैसर्गिक वाळूसाठी कृत्रिम वाळू किंवा एम सँड ही सर्वात योग्य पर्यायी सामग्री म्हणून एम सँडला प्रोत्साहन देण्यासाठी धोरण निश्चित करण्यात आले आहे. याबाबतही विभागीय आयुक्त श्री.पापळकर यांनी आढावा घेतला.

## जिल्हास्तरीय शालेय फुटबॉल क्रीडा स्पर्धेमध्ये महाराणी ताराबाई शाळेचा मुलांचा संघ उपविजेता

**वडवणी । प्रतिनिधी**

**क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय शालेय फुटबॉल क्रीडा स्पर्धा दि.२ सप्टेंबर २०२५ मंगळवार रोजी शिवछत्रपती क्रीडा संकुलन बीड या ठिकाणी संपन्न झाली.**



या स्पर्धेमध्ये वडवणी शहरातील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील १७ वर्षे वयाखालील मुलांचा फुटबॉल संघ उपविजेता ठरला त्यांनी सिल्वर मेडल मिळवले जिल्हास्तरीय शालेय फुटबॉल क्रीडा स्पर्धेमध्ये उपविजेता संघ ठरलेला वडवणी तालुक्यातील पहिली शाळेचा मान महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाला मिळाला आहे.

जिल्हा फुटबॉल उपविजेत्या संघाचा कर्णधार महेश मुंडे, पवन इंगळे,रोहन वजीर,वॉडरे कृष्णा,मायकर कृष्णा,अजय आंधळे,श्रीपाद गार्डी,दिप निवरकर,उदय दिवटे,शिवम भांगे,आदित्य चव्हाण,आयुष कळसकर,गोरख मुंडे,सागर केदार,उमेश जोशी,अजय राऊत या खेळाडूंचा व त्यांना प्रशिक्षण देणारे प्रशिक्षक(कोच)तथा संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे व क्रीडा शिक्षक निवरकर सर यांचा या यशाबद्दल महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे / डोईफोडे मॅडम तसेच उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर , हिंदी विषयाचे जेष्ठ अध्यापक डोईफोडे सर यांच्या हस्ते हार,पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

## संसाराचे दास्यत्व करु नका जीवनाचा उध्दार करुन घेण्यासाठी संतदास व्हा -ह.भ.प.प्रविण महाराज तरटे

आष्टी । प्रतिनिधी

संसार कधीच पुर्ण होणार नाही. संसारात दुःख मिळेल.परमार्थ सुख देते.संताने केलेला संसार खोटा म्हणून केला म्हणून त्यांना सुख मिळाले.संसाराचा दास्यत्व करु नका.संसारात बैल,गाढवाची उपमा मिळते. संसारात कीतीही अपमान झाला तरी आपण संसार सोडत नाहीत तर य ऊलट परमार्थात आपला अपमान झाला की आपण परमार्थ सोडुन देतो परंतु परमार्थ सोडु नका.ऊलट संसारात अपमान झाला की आपण संसार सोडु द्यावा.सत्य, प्रकाश,आनंद तेथे देव असतो.



संसाराचे दास्यत्व करु नका जीवनाचा उध्दार करुन घेण्यासाठी संतदास व्हा असे प्रतिपादन युवा कीर्तनकार ह.भ.प.प्रविण महाराज तरटे यांनी केले.आष्टी शहरातील संदीप दिगांबर सोले यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आयोजित कीर्तन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी शिवाजी कोकणे महाराज, संतोषभैय्या चव्हाण, राकेश हंबर्डे,उत्तम बोडखे,शरद रेडेकर, भाऊसाहेब कोकणे,प्रा. सुभाष रासकर,गोवींद उर्फ बाळासाहेब सोले,डा.अभिजीत सायंबर आदि राजकीय, सामाजिक,धार्मिक आदि क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## टाळ मृदुंगाचा गजर आणि पारंपारिक वाद्याने फोटोग्राफर संघटनेच्या गणरायाचे विसर्जन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुका फोटोग्राफर असोसिएशनच्या वतीने मंगळावरी मोठ्या थाटात गणरायला निरोप देण्यात आला.६० मुला मुलीच्या वारकरी टीमने टाळ मृदुंग आणि हातात भगवी पताका घेऊन विठू नामाचा केलेला गजर आणि पारंपारिक वाद्याचा कानावर पडलेला सुमधुर ध्वनीने आष्टीकरांना मंत्रमुग्ध केले.



आष्टी तालुका फोटोग्राफर असोसिएशनच्या वतीने दरवर्षी गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात येते.यंदाही असोसिएशनच्या वतीने गणरायाची स्थापना करण्यात आली होती.गौरी गणपती विसर्जनाच्या दिवशी गणरायाला निरोप देण्यात येतो.तालुक्यातील पारगाव जोगेश्वरी येथील ह.भ.प. अशोक महाराज भोसले यांच्या शिक्षण संस्थेत शिक्षण घेणाऱ्या ६० हून अधिक मुला मुलींच्या वारकरी वेश परिधान करून विविध अभंगावर टाळ मृदुंगाचा केलेला गजर तसेच शहरातील मुख्य चौकात भारुड,फुगडी खेळण्याचा लुटलेला आनंद यामुळे समस्त आष्टी करांचे लक्ष या भजनी पथकाकडे होते.शिवाय पारंपरिक पद्धतीच्या असलेल्या वाद्यामुळे या मिरवणुकीला विशेष महत्व प्राप्त झाले होते.दुपारी ४.वाजता गणरायाची विधिवत पूजा करून निरोप देण्यात आला. वेळी तालुक्यातील सर्व फोटोग्राफर बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

## गणेशोत्सवानिमित्त ह.भ.प.मोहन महाराज शेलार यांचे कीर्तन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरातील श्री गणेश उत्सव २०२५ निमित्त ह.भ.प. प्राचार्य अशोक डोके यांच्या मार्गदर्शनाखाली कोणतीही वर्गणी किंवा देणगी न स्विकारता स्वखर्चाने सर्व गणेश मंडळाचे कार्यक्रम केले जात आहेत.यंदा सातव्या वर्षी शहरातील दत्तनगरातील समर्थ गणेश मंडळ आयोजित दि.२९ आगस्ट ते ५ सप्टेंबर या कालावधीत भव्य कीर्तन महोत्सव होत आहे.



आज गुरुवार दि.४ सप्टेंबर रोजी ह.भ.प.मोहन महाराज शेलार यांचे रात्री ८ ते १० यावेळात कीर्तन होणार आहे.उद्या शुक्रवार दि.५ सप्टेंबर रोजी गणेश विसर्जननिमित्त रात्री ८ ते १० या वेळात महाराष्ट्र राज्य वारकरी महामंडळाचे मराठवाडा उपाध्यक्ष ह.भ.प.आदिनाथ महाराज दानवे यांचे काल्याचे किर्तन होणार आहे.या कार्यक्रमासाठी सर्व गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मंडळाचे आयोजक ह.भ.प. प्राचार्य अशोक डोके सर यांनी केले आहे.

## निवडश्रेणी व वरिष्ठ वेतनश्रेणी सर्वांचा हक्क - बाळासाहेब शिरसाट

बीड । प्रतिनिधी

शासकिय सेवेमध्ये शिक्षकांना तसेच कर्मचा ऱ्यांना नोकरीतील ठराविक सेवा कालावधीनंतर विशिष्ट लाभ देण्याबाबत शासननिर्णय आहेत. शिक्षकांना सेवेत सलग १२ वर्ष पुर्ण झाल्यानंतर वरिष्ठवेतन श्रेणीचा लाभ देण्यांत येतो, तसेच २४ वर्ष सलग सेवेनंतर निवडश्रेणी चा लाभ मिळतो . निवडश्रेणी व वरिष्ठ वेतनश्रेणी मिळणे सर्व शिक्षकांचा कायदेशिर हवक असल्याचे प्रतिपादन कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाचे राज्य उपाध्यक्ष बाळासाहेब सिरसाट यांनी केले आहे

पात्रतेमध्ये पुढील टप्प्यावरील शिक्षणात वाढ करणे, गोपनीय अहवाल, सेवांतर्गत प्रशिक्षणे व इतर बरेच निकष असतात . वास्तविकपणे पात्र शिक्षकांना दरवर्षी वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ देणे तसेच पात्र २०% शिक्षकांना जेष्ठतेनुसार निकषांच्या आधारे . निवडश्रेणी मिळते . परंतू झारितले शुक्राचार्य हे शिक्षक बांधवांना मिळणाऱ्या लाभापासून वंचित ठेवण्याचे काम करतात . मग सुरु होते चिरिमिरी ची कहानी . यामध्ये कार्यालयीन बाबुबरोबरच त्यांच्या संपर्कात असणारे शिक्षकांचे कैवारी महाशय . संगणमताने शिक्षकांना आर्थिक विळखा घालण्याचे काम करतात . या सर्व चुकीच्या बाबींना, अनियमिततेला व अर्थकारणाला कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाने नेहमीच विरोध केलेला आहे . याचाच भाग म्हणून सदरिल विभागाचे लिपिक श्री देशपांडे यांची तक्रार संघटनेने मा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे केलेली असून अनियमितता करणारे लिपिक देशपांडे यांचेवर प्रशासकीय शिस्तभंगाची कारवाई करण्या बाबत निवेदन दिलेले आहे .



निवडश्रेणी व वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ पात्र सर्वच शिक्षकांना मिळावेत यासाठी कास्ट्राईब चे प्रयत्न सतत सुरु आहेत. प्रशासनाकडे पाठपुराव सुरु असुन पात्र सर्वांना लाभ मिळेपर्यंत पाठपुरावा सुरु राहणार आहे . शिक्षकांच्या हितासाठी कास्ट्राईब सतत प्रयत्नशील असते हे सर्वश्रुत आहे . एक लढवय्यी संघटना असा कास्ट्राईबचा बाणा आहे . वरिष्ठ वेतनश्रेणी व . निवडश्रेणी चा टप्पा किमान दोन वर्षांपासून प्रलंबित होता, या मध्ये अनियमितता झालेली असून अनेक शिक्षक बांधवावर अन्याय झालेला आहे त्यामुळे शिक्षकांचा प्रचंड रोष शिक्षण विभागावर आहे . कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाची बैठक मा . जतीन रहेमान मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सोबत संपन्न झाली असुन सदरिल बैठकीसाठी मा उपमुख्य कार्यकारी अधिकारी काकडे साहेब, मा शिक्षणाधिकारी भगवान फुलारी हे उपस्थित होते . बैठकीमध्ये सन २०१८ पासुन २०२५ पर्यंत ज्या - ज्या वर्षांचे प्रस्ताव काढले नाहीत त्या सर्व प्रलंबित वर्षाची एकत्रित टवकेवारी गृहीत धरून सप्टेंबर अखेरपर्यंत पात्र शिक्षकांना सर्वांनाच निवडश्रेणी व वरिष्ठवेतन श्रेणीचा लाभ मिळावेत अशी मागणी बैठकीत करण्यांत आली . नसता कास्ट्राईब आंदोलन करून वरिष्ठांकडे शासनस्तरावर दाद मागण्यांत येईल हा . इशारा संघटनेचे राज्य उपाध्यक्ष बाळासाहेब सिरसाट, भगीरथ मस्के , जिल्हा अध्यक्ष - भाऊसाहेब हंगे, जिल्हा सचिव - राहुल सुपेकर, उपाध्यक्ष - संजय दराडे यांनी बैठकीत दिला. अधिकारी निवडश्रेणी व वरिष्ठ वेतनश्रेणी लाभ देण्यासाठी अनुकूल असुन सकारात्मक आहेत. सप्टेंबर अखेरपर्यंत प्रस्ताव मंजूर होऊन आदेश निघतील असे शिक्षणाधिकारी यांनी सांगितले .


## पोलीस ठाणे अंबाजोगाई ग्रामीण जि बीड
## जाहिर निवेदन

पोलीस ठाणे अंबाजोगाई ग्रामीण पोस्टे हादीत व आवारामध्ये खालील वर्णनाच्या मोटार सायकली/बेवारस मिळुन आलेल्या आहेत. सदर मोटार सायकल बाबत कोणीही मालकी हक्क दाखविणेस आले नाही तरी मोटार सायकल बाबत कोणाची मालकी असलेले वाहनाचे मुळ कागदपत्र अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यास घेवुन हजर येवुन खात्री करुन वाहने घेवुन जावी सदरची वाहने ही उघडयावर व उन पावसात असुन पुर्णपणे खराब होण्याची शक्याता आहे तरी कोणाची वाहने असतील त्यांनी १५ दिवसाचे आत मालकी हक्क सिध्द केला नाही तर कायदेशीर मार्ग अन्वये सदर वाहनाचा लिलाव करुन येणारी रक्कम सरकार जमा करण्यात येईल याची सर्वानी नोंद घ्यावी तसेच सर्व इंन्सुरस कंपनी व बॅकानी याची नोंद घ्यावी पोलीस निरिक्षक एम.आर.खोकले पोलीस ठाणे अंबाजोगाई ग्रामीण यांनी केले आहे.

**संपर्क:- पोलीस ठाणे अंबाजोगाई ग्रामीण फोन नंबर ०२४४६-२४८५४२**
**पोलीस निरिक्षक :-एम.आर खोकले मोन ९८५०९०९५५५**
**सहा पोलीस निरिक्षक आर एम जगताप मोन ९०२८७१९३२९**
**क्राईम मोहरील मपोह/७८५ दहीवाडे मोन ९८९०७१५२२८**

| अ.क्र. | पासींग क्रमांक | चेसीस नंबर | इंजीन नंबर | कंपनी | मॉडल | रंग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नंबर नाही | ०२ एम २० एफ ३१०५७ | खोडला आहे | हिरो होन्डा | स्पेंलडर | काळी |
| २ | एमएच २४ बीएफ ४५६० | एमबीएलएच एसी ०२४ के ५एल ८४६५० | एमएफ ३९९७ सीएम जीबीजी | हिरो | एचएफ डिलक्स | काळी |
| ३ | एमएच १४ बीबी ४७५० | एमडी ०६२५ केएफ ५७६२६३७५४८ | नाही | टिव्हीएस | स्टारसिटी | निळा |
| ४ | एमएच ०२एडब्ल्यु ३९५९ | एमडी २ डी डी डी झेड झेड झेड एनडब्ल्यु ए ई ५४७२२ | खोडला आहे | बजाज | प्लॅटीना | काळी |
| ५ | एमएच ४४ एन १०१ | एमडीएलएम सी ३८ अर्धा खोडलेला | खोडला आहे | हिरो होन्डा | करिज्मा | पिवळी |
| ६ | एमएच ०६ पी ४०२० | ०० एल २० सी २४७९० | आयएस २ जी बी जी | हिरो होन्डा | स्पेल्डर प्लस | काळा |
| ७ | एमएच १६ एबी ६४१९ | एमडी ६२ एक्स ए ६७८४० | खोडला आहे | टिव्हीएस | स्टारसीटी | काळी |
| ८ | नंबर नाही | एमडी २ डीएसजे बी झेड झेड पी डब्ल्यु जे ०२८८७ | खोडला आहे | बजाज | एक्ससीडी | लाल |
| ९ | एमएम ११ के ६८७१ | एमबीएलएचए आय १०ईव्हीबी एचए ०२४८५अ | ५० सी एम ३ जी बी जी | हिरो होन्डा | पॅशन प्रो | काळा |
| १० | एमएच २३ एम ४४३० | नाही | नाही | बजाज | स्कुटी | काळी |
| ११ | एमएच २४ पी ५८३६ | खोडला आहे | खोडला आहे | हिरो होन्डा | सीडी १०० | काळी |
| १२ | एमएच २५ वाय ४८०६ | एमडी ६२५एफएफ ५४ बी १ एल ६३३७१ | खोडला आहे | टिव्हीएस | स्पोर्ट | काळी |
| १३ | एमएच २३ जी ८८२० | एम १००७ एफ ०१२०३९ | खोडला आहे | मारोती | सुझुकी | काळी |
| १४ | एमएच २३ युए ८५२० | ०६सी ०९ सी २६२९ | एमएफ २४९४० एमजीडीजी | हिरो होन्डा | स्पॅशन प्रो | काळी |
| १५ | एमएच २६ एम १०९२ | डी डी एफ बी जे एफ २५५८० | खोडला आहे | बजाज | कॉलीबर | निळी |
| १६ | एम एच २३ ए ए ६७८८ | एमडी ०२पीएलझेडयु डब्ल्यु ८११८८ | जेबीएसझेड १०१० | बजाज | डिस्कव्हर | काळी |
| १७ | एमएच १२ डीयु ४५६८ | ०६ के १६ सी ४५३९५ | पीएम १३९७ सीएम ओबीसी | हिरो होन्डा | स्पेल्डर | काळी |
| १८ | एमएच १३ बी एफ ६२०९ | एमडी ०२ डी ५ डी एक्स झेड झेड एन ए ए ३१३५३ | खोडला आहे | बजाज | डिस्कव्हर | काळी |
| १९ | नंबर नाही | डीएमएफबीजे एच २८४९० | खोडला आहे | बजाज | कावासकी | लाल |
| २० | एमएच १९ एक्स ९७२८ | ०२ एल २० सी ३१७२९ | आर म ९७०एम जीबीजी | हिरो होन्डा | स्पॅल्टार प्लस | काळी |
| २१ | सी डी १०० एस एस नबंर नसलेली | खोडलेला | इंजीन नंबर नसलेली | हिरो होन्डा | सीडी १०० एसएस | काळी |
| २२ | एमएच २३ के ७१८८ | खोडलेला | खोडलेला | हिरो होन्डा | सीडी डिलक्स | काळी |
| २३ | एम.एच-०३पी ६५८५ | खोडलेला | खोडलेला | बजाज | कावासकी | काळी |
| २४ | नंबर नाही | एमडी २ डी एच डी एच झेड झेड आरसीए ७४२९८ | खोडलेला | बजाज | | काळी |


cmyk

# मराठवाड्यातल्या तीन जिल्ह्यांतील दहा मंडलात अतिवृष्टी; नांदेडमध्ये जोर अधिक

संभाजीनगर : मराठवाड्यातील छत्रपती संभाजी नगर जालना व नांदेड या तीन जिल्ह्यांतील दहा मंडलांत मंगळवारी सकाळपर्यंतच्या २४ तासांत अतिवृष्टी झाली. इतर जिल्ह्यांच्या तुलनेत नांदेड जिल्ह्यात पावसाचा जोर अधिक होता. अतिवृष्टी झालेल्या मंडलांमध्ये छत्रपती संभाजीनगरमधील एक, जालनातील तीन तर नांदेडमधील सहा मंडलांचा समावेश आहे.



छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सरासरी १०.७ मिलिमीटर, जालनामध्ये १६.२ मिमी, बीडमध्ये ०.१ मिमी, लातूरमध्ये ०.२ मिमी, नांदेडमध्ये १७.३ मिमी, परभणीत २.८ मिमी तर हिंगोलीत सरासरी १२.६ मिमी पाऊस झाला. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड, सोयगाव, जालना जिल्ह्यातील भोकरदन, जाफराबाद, नांदेड जिल्ह्यातील किनवट, नांदेड, माहूर, हिमायतनगर आदी तालुक्यांत पावसाचा जोर अधिक होता. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यात सरासरी ५०.९ मिमी तर सोयगाव तालुक्यात सरासरी ४६.७ मिमी पाऊस झाला. जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यात सरासरी ४७.५ मिमी, जाफराबादमध्ये ४०.६ मिमी, जालन्यात १३. १ मिमी सरासरी पाऊस झाला. बीड जिल्ह्यात पावसाने जवळपास उसंतच दिल्याची स्थिती होती. काही ठिकाणी तुरळक हलका पाऊस झाला. नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यात सरासरी ६३ मिमी, हिमायतनगरमध्ये ३७.४ मिमी, माहूरमध्ये ४७.१ मिमी, नायगावमध्ये २०.५ मिमी, नांदेडमध्ये १३.९ मिमी, बिलोलीमध्ये १२.८ मिमी, हातगावमध्ये १४.३ मिमी, भोकरमध्ये सरासरी १७.७ मिमी पाऊस झाला. जिल्ह्यातील इतर तालुक्यात पावसाची हजेरी पुरळक हलक्या तर काही ठिकाणी मध्यम स्वरूपाची होती. हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली तालुक्यात सरासरी १६.५ मिमी, कळमनुरीत १५ तर सेनगावमध्ये सरासरी १८.८ मिमी पाऊस झाला. इतर तालुक्यात पावसाची हजेरी तुरळक हलक्या स्वरूपाची होती. लातूर व धाराशिव जिल्ह्यातही काही ठिकाणी तुरळक हलका झालेला पाऊस वगळता इतरत्र पावसाची हजेरी नसल्यातच जमा होती.

## सौर फवारणी पंपावर ५० टक्के अनुदान; असा करा अर्ज



पिकांवरील कीड आणि रोगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी, पिकांची वाढ सुनिश्चित करण्यासाठी आणि त्यांची उत्पादकता वाढवण्यासाठी फवारणी केली जाते. काही शेतकरी भाड्याने फवारणी पंप घेतात तर जास्त जमीन क्षेत्र असणाऱ्या शेतकऱ्यांकडे स्वतःचा पंप असतो. आजकाल सौर ऊर्जेवर चालणाऱ्या पंपांची मार्केट मध्ये मोठी चलती आहे, मात्र पंपाची किंमत जास्त असल्याने अनेक शेतकरी ते खरेदी करू शकत नाही. याच पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना कमी किमतीत सौर फवारणी पंप खरेदी करता यावा यासाठी कृषी विभागाकडून सौर फवारणी पंप योजना सुरु केली आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदान मिळू शकते. यासाठी पात्रता काय आहे? अर्ज कसा करायचा? याबाबत माहिती जाणून घेऊया

शेतकऱ्यांचा खर्च वाचतोय : ही योजना शेतकऱ्यांचा सिंचनाचा खर्च कमी करण्यासाठी आहे .शेतकऱ्यांना पर्यावरणपूरक आणि खर्चिक वीज किंवा इंधनाऐवजी सौरऊर्जेवर चालणारे पंप देण्यात येतात. डिझेल आणि विजेचा खर्च वाचल्याने शेतकऱ्यांची आर्थिक बचत होते. महत्वाची गोष्ट म्हणजे पूर्वीसारखं शेतकऱ्यांना पाठीवर पंप न घेता एका जागेवर ठेवून दिवसभर फवारणी करता येते, त्यामुळे शेतकऱ्याचं कष्ट आणि मेहनत सुद्धा वाचते. ही योजना विशेषतः लहान व गरजू शेतकऱ्यांसाठी फायदेशीर आहे, यामध्ये महिला, अल्पभूधराक किंवा अनुसूचित जाती/जमातीतील असल्यास त्यांना ५० टक्के अनुदान मिळते, तर इतर पात्र शेतकऱ्यांना ४० टक्के अनुदान देण्यात येते.

पात्रता काय ?: अर्जदाराकडे स्वतःच्या नावावर शेत जमीन असावी. अर्जदाराने यापूर्वी महाडीबिटी द्वारे कृषी यांत्रिकीकरण योजनेचा लाभ घेतलेला नसावा. यापूर्वी फवारणी पंप योजनेसाठी अनुदान घेतलेले नसावे.

कोणकोणती कागदपत्रे लागतात?: फार्मर आयडी, आधार कार्ड, ७-१२ उतारा व ८-अ उतारा, जमिनीचा दाखला (लागू असल्यास), मोबाईल नंबर, पॅन कार्ड, बँक पासबुक.

अर्ज कुठे करायचा?: सौर फवारणी https://mahadbt.maharashtra.gov.in/farmer/login/login या संकेतस्थळावर भेट द्या. किंवा अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधा.

## मत्स्यपालनासाठी जाणून घ्या किफायतशीर मार्ग

काही माशांच्या प्रजाती इतरांपेक्षा अधिक किफायतशीर आणि पालन करणे सोपे असते, ज्यामुळे त्या बजेट-अनुकूल ऑपरेशन्ससाठी आदर्श बनतात.

तिलापिया : तिलापिया त्यांच्या टिकाऊपणासाठी आणि विविध पर्यावरणीय परिस्थितीत वाढण्याची क्षमता यासाठी ओळखले जातात. त्यांचे पालन करणे तुलनेने सोपे आहे आणि त्यांच्या सौम्य चवीच्या पांढऱ्या मांसामुळे ते मत्स्यपालनात लोकप्रिय आहेत.

कॅटफिश : कॅटफिश, विशेषतः चॅनेल कॅटफिश सारख्या प्रजाती, मत्स्यपालनासाठी योग्य आहेत. त्यांची भूक तीव्र असते, ते लवकर वाढतात आणि वेगवेगळ्या पाण्याच्या परिस्थितीशी जुळवून घेतात. विशेषतः चॅनेल कॅटफिशची मागणी जास्त असल्याने अनेक प्रदेशांमध्ये मोठ्या प्रमाणात शेती केली जाते.

कार्प : सामान्य कार्प आणि त्याच्या विविध जाती, जसे की ग्रास कार्प आणि सिल्व्हर कार्प, हे किफायतशीर मत्स्यपालनासाठी लोकप्रिय पर्याय आहेत. कार्प त्यांच्या लवचिकता, कमी दर्जाच्या पाण्यात वाढण्याची क्षमता आणि कार्यक्षम खाद्य रूपांतरणासाठी ओळखले जातात.ट्राउट : रेनबो ट्राउट आणि इतर ट्राउट प्रजाती कमी बजेटच्या माशांच्या शेतीसाठी योग्य असू शकतात, विशेषतः थंड पाण्याच्या वातावरणात.

तिलापिया हायब्रिड : तिलापिया हायब्रिड सारख्या हायब्रिड तिलापियाची पैदास त्यांच्या जलद वाढीसाठी आणि रोग प्रतिकारशक्तीसाठी केली जाते.

तलावाची डिझाइन आणि बांधकामाची मूलभूत माहिती : मुख्य पायरी म्हणजे तुमच्या तलावासाठी योग्य जागा निवडणे असते. पाण्याच्या स्त्रोतांची उपलब्धता आणि योग्य निचरा होणारा परिसर आदर्श आहे. पुढे, तुम्ही ज्या प्रजातींची शेती करण्याची योजना आखत आहात त्यानुसार तलावाचा आकार विचारात घ्या. तलावाची खोली योग्य ऑक्सिजन परिसंचरण आणि तापमान नियमन करण्यास अनुमती देते याची खात्री करा. योग्य बांधकाम तंत्रांमध्ये माती कॉम्पॅक्ट करणे, आवश्यक असल्यास तलावाचे अस्तरीकरण करणे आणि पाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी इनलेट आणि आउटलेट पाईप्स बसवणे समाविष्ट आहे. पाण्याची गुणवत्ता राखताना गळती रोखणे आवश्यक आहे. तलावाभोवती असलेल्या वनस्पतींसारखे नैसर्गिक घटक तुमच्या माशांना सावली आणि निवारा देऊ शकतात. याव्यतिरिक्त, वायुवीजन प्रणाली लागू केल्याने पाण्यात ऑक्सिजनची पातळी सुधारू शकते.पाण्याची गुणवत्ता व्यवस्थापन : तुमच्या तलावातील पाणी स्वच्छ आणि संतुलित आहे याची खात्री केल्याने रोगांचा प्रादुर्भाव रोखता येतो आणि माशांच्या वाढीचा दर वाढतो. निरोगी जलीय वातावरण राखण्यासाठी ऑक्सिजन पातळी, पीएच, तापमान आणि अमोनिया सांद्रता यासारख्या पॅरामीटर्सचे निरीक्षण करणे महत्त्वाचे आहे. परवडणाऱ्या चाचणी किटचा वापर करून पाण्याच्या गुणवत्तेची नियमितपणे चाचणी केल्याने संभाव्य समस्यांबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी मिळू शकते.



# अशा पद्धतीने करा वाटाणा पिकाची लागवड

वाटाणा हे थंड हवामानातील पीक असून या पिकाची महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. वाटाण्याचा उपयोग आहारात भाजी म्हणून केला जातो. हिरवे वाटाणे हवाबंद करून, गोठवून किंवा सुकवून बराच काळ साठविता येतात. हिरवे ओले वाटाणे वाळवून त्यापासून डाळ बनविता येते. वाटाण्यामध्ये कार्बोहाइड्रेट, प्रोटीन्स तसेच फॉस्फरस, पोटॅशियम, मेग्निशियम हि खनिजे आणि अ, ब, व क जीवनसत्वे भरपूर प्रमाणात असतात.

वाटाणा लागवडीसाठी जमिनीची निवड : वाटाणा लागवडीसाठी मध्यम ते भारी निचऱ्याची जमीन निवडावी. जमिनीचा सामू ५.५ ते ६.७ इतका असावा. लागवडीपूर्वी उभी आडवी नांगरट करून २ ते ३ कुळवाच्या पाळ्या द्याव्यात. ढेकळे व्यवस्थित फोडून जमीन सपाट करून घ्यावी.

सुधारीत जाती व लागवडीचे अंतर : वाटाणा लागवडीसाठी बोनव्हिला, अरकेल, फुले प्रिया या वाणांची लागवड करावी. वाटाण्याची लागवड रब्बी हंगामात ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात करावी. सरी-वरंबे किंवा सपाट वाफे पद्धतीने लागवडीसाठी ३० बाय १५ सें.मी. इतके अंतर ठेवावे. टोकण पद्धतीने लागवड करण्यासाठी प्रतिहेक्टरी ३०-४० कि.ग्रॅ. बियाणे लागते. तर पेरणी पद्धतीने लागवडीसाठी प्रतिहेक्टरी ७०-८० कि.ग्रॅ. बियाणे लागते.



बीजप्रक्रिया व खत व्यवस्थापन : कॅप्टन किंवा कार्बेन्डाझिम ३ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणात बियास चोळावे. लागवडीपूर्वी १५:६०:६० किलो नत्र:स्फुरद:पालाश प्रतिहेक्टरी द्यावे. लागवडीनंतर एक महिन्याने १० किलो नत्र खताची मात्रा द्यावी. वाटाणा पिकाचा कालावधी वाणानुसार ८० ते १०० दिवसांचा असतो.

रोग व कीड व्यवस्थापन : वाटाणा पिकावर मावा, शेंगा पोखरणारी आली या किडींचा तर भुरी, मर रोग या रोगांचा प्रादुर्भाव आढळून येतो. मावा ही कीड हिरव्या रंगाची अत्यंत लागण असते. ते पानातून रस शोषून घेतात. त्यामुळे झाडे निस्तेज बनतात.

शेंगा पोखरणारी अळी: हिरव्या रंगाची हि अळी प्रथम शेंगाची साल खाते व आत शिरते आणि दाणे पोखरून खाते. यासाठी मॅलॅथिऑन ५० ईसी, ५०० मिली किंवा फॉस्फॉमिडॉन ८५ डब्ल्यू ईसी, १०० मिली किंवा डायमेथोएन ३० ईसी, ५०० मिली किंवा मिथिलडेमेटॉन २५ ईसी, ४०० मिली, ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रती हेक्टरी फवारावे. पेरणीनंतर ३ आठवड्यांनी पहिली फवारणी करावी. भुरी रोगामुळे पिकाचे अतोनात नुकसान होते. या रोगात प्रथम पानांच्या दोन्ही बाजूंवर पांढरी पावडरीसारखी बुरशी दिसून येते.

नंतर ती रोपाच्या सर्व हिरव्या भागावर जलद पसरते व झाडाची उत्पादनक्षमता त्यामुळे खालावते. यासाठी मार्फोलीन २५० मिली किंवा पानाय्त मिसळणारे गंधक ८० टक्के १२५० ग्रॅम किंवा डिनोकॅप ४० डब्ल्यू पी ५०० ग्रॅम प्रती हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. किंवा गंधकाची भुकटी ३०० मेश प्रतिहेक्टरी २० किलो या प्रमाणात धुरळावी. नंतर १५ दिवसांच्या अंतराने फवारणी / धुरळणी करावी. रोगास प्रतिबंधक अशा जातींचा वापर करावा. मर या रोगाचा प्रसार जमिनीतील बुरशीमुळे होतो. रोगग्रस्त झाड पिवळे पडून वाळते. उपाय म्हणून पेरणीपूर्वी बियास थायरम हे बुरशीनाशक औषध प्रति किलोस ३ ग्रॅम या प्रमाणात चोळावे.

वाटाणा पिकाचे वाणपरत्वे हिरव्या शेंगाचे- ४ ते ७ टन तर वाळलेले वाटाणे १.५ ते २ टन इतके प्रति हेक्टरी उत्पादन मिळते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८८२ : थॉमस एडिसन यांनी इतिहासातील पहिल्या व्यावसायिक विद्युत ऊर्जा प्रकल्प चालु केले वीजयुगाची सुरुवात म्हणून हा दिवस ओळखला जातो.

१८८८ : जॉर्ज इस्टमन याने 'कोडॅक' हा ट्रेडमार्क नोंदवला व फिल्म कॅमेर्याचे पेटंट घेतले.

१९०९ : लॉर्ड बेडन पॉवेल यांच्या स्काऊटचा पहिला मेळावा झाला.

१९३७ : व्हेनिसमधील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'प्रभात'च्या 'संत तुकाराम' या चित्रपटाची जगातल्या तीन उत्कृष्ट चित्रपटांपैकी एक चित्रपट म्हणून निवड झाली. इतर दोन चित्रपट होते ऑस्ट्रेलियाचा 'फ्लाइंग डॉक्टर' आणि हंगेरीचा 'मारिया नोव्हेर'.

१९०९ : बालवीर चळवळीचा पहिला मेळावा झाला. लॉर्ड बेडन पॉवेल यांनी सुरू केलेली ही चळवळ थोड्याच काळात जगभर पसरुन लोकप्रिय झाली.

१९९८ : स्टॅनफोर्ड विद्यापीठातील लॅरी पेज व सर्गेइ ब्रिन या दोन विद्यार्थ्यांनी 'गुगल'ची स्थापना केली.

१९७२ : मार्क स्पिटझ हा एकाच ऑलिम्पक स्पर्धेत ७ सुवर्णपदके मिळवणारा पहिला खेळाडू बनला.

१९९८ : स्टॅनफोर्ड विद्यापीठातील लॅरी पेज व सर्गेइ ब्रिन या दोन विद्यार्थ्यांनी गुगलची स्थापना केली.

२००१ : या कंपनीने संगणक क्षेत्रातील ही बलाढ्य कंपनी २५ अब्ज डॉलर्सला विकत घेतली.

२०१२ : लंडनमध्ये मध्ये झालेल्या पॅरालंपिक स्पर्धेत भारतीय पॅरालंपिक खेळाडू गिरीशने उंच उडी क्रीडा प्रकारात भारताला पहिले पदक मिळवून दिले.

२०१३ : रघुराम राजन यांनी 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया'चे २३ वे गव्हर्नर म्हणुन पदभार हाती घेतला.

२०१८ : युवा भारतीय बॅडमिंटनपटू अनुष्का पारीख आणि सौरभ शर्मा यांनी युक्रेनच्या खारकिव्ह येथे खारकिव्ह आंतरराष्ट्रीय चॅलेंजच्या मिश्र दुहेरीचे विजेतेपद पटकावले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२२१ : श्री चक्रधर स्वामी महानुभाव पंथाचे संस्थापक (मृत्यू: ७ फेब्रुवारी १२७४)

१८२५ : पितामह दादाभाई नौरोजी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे एक संस्थापक आणि राजकीय व सामाजिक नेते, ब्रिटिश संसदेचे सदस्यत्त्व मिळवणारे पहिले भारतीय (मृत्यू: ३० जून १९१७)

१८८० : भारतीय स्वातंत्र संग्रामातील प्रसिद्ध क्रांतिकारक तसचं, प्रख्यात समाजशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञ भूपेंद्रनाथ दत्त यांचा जन्मदिन.

१८९५ : प्रसिद्ध भारतीय हिंदी लेखक व राष्ट्रकवि मैथिलीशरण गुप्त यांचे छोटे भाऊ सियाराम शरण गुप्त यांचा जन्मदिन.

१९०१ : जॅग्वोर कार चे सहसंस्थापक विल्यम लियन्स जॅग्वोर यांचा जन्म. (मृत्यू: ८ फेब्रुवारी १९८५)

१९०५ : मिनॉक्स चे शोधक वॉल्टर झाप यांचा जन्म. (मृत्यू: १७ जुलै २००३)

१९१३ : परमेश्वर नारायण तथा पी. एन. हक्सर प्रशासक व मुत्सद्दी, पंतप्रधानांचे मुख्य सचिव, योजना आयोगाचे उपाध्यक्ष (मृत्यू: २५ नोव्हेंबर १९९८)

१९२३ : भारतीय वकील आणि राजकारणी राम किशोर शुक्ला यांचा जन्म. (मृत्यू: ११ डिसेंबर २००३)

१९३७ : शंकर सारडा साहित्यिक व समीक्षक. सारडा यांनी ६० हून अधिक पुस्तकं लिहिली असून, दोन हजांराहून अधिक पुस्तकांचं समीक्षण केलं आहे. (मृत्यू: २८ जानेवारी २०२१)

१९४१ : सुशीलकुमार शिंदे प्रसिद्ध भारतीय राजकारणी व भारतीय महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तसचं, माजी केंद्रीय गृहमंत्री

१९५२ : ऋषी कपूर सुप्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट अभिनेते

१९६२ : किरण मोरे भारतीय क्रिकेट संघाचे माजी क्रिकेटपटू आणि यष्टीरक्षक तसचं, बीसीसीआय निवड समितीचे माजी अध्यक्ष

१९६४ : भारतीय गायक-गीतकार आदेश श्रीवास्तव यांचा जन्म. (मृत्यू: ५ सप्टेंबर २०१५)

१९७१ : लान्स क्लूसनर दक्षिण अफ्रिकेचा अष्टपैलू क्रिकेटपटू

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१२ : भारतेंदु कालीन अग्रगण्य साहित्यिकांपैकी एक सुप्रसिद्ध साहित्यकार मोहनलाल विष्णू पंड्या यांचे निधन.

१९९७ : डॉ. धर्मवीर भारती हिन्दी लेखक, कवी, नाटककार, पत्रकार व 'धर्मयुग' साप्ताहिकाचे २७ वर्षे संपादक, 'अभ्युदय' व 'संगम' या नियतकालिकांचे संपादनही त्यांनी केले. (जन्म: २५ डिसेंबर १९२६)

२००० : मोहम्मद उमर 'मुक्री' आपल्या अभिनयाद्वारे पाच दशके खळाळून हसवणारे विनोदी कलाकार व चरित्र अभिनेते (जन्म: ५ जानेवारी १९२२)

२०१२ : भारतीय लेखक सय्यद मुस्तफा सिराज यांचे निधन. (जन्म: १३ ऑक्टोबर १९३०)

२०१२ : भारतीय गायक-गीतकार हांक सूफी यांचे निधन. (जन्म: ३ मार्च १९५२)

२०१५ : भारतीय सर्जन आणि राजकारणी विल्फ्रेड डी डिसोझा यांचे निधन. (जन्म: २३ एप्रिल १९२७)

# जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक

जालना। प्रतिनिधी

ग्राहकांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. या बैठकीस जिल्हा पुरवठा अधिकारी तथा सदस्य सचिव सविता चौधर, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी डी.एस. दिवटे, कृषी विभागाचे श्री. कापसे, अशासकीय सदस्य रमेश तारगे, विजय जाधव, सतिश पंच, नंदकुमार देशपांडे, बाबासाहेब सोनटक्के शालिनी पुराणिक, संजय देशपांडे, मधुकर सोनोने, दिलीप लाड, मोहन इंगळे, बालाप्रसाद जेथलिया आदींची बैठकीस उपस्थिती होती.



यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी, जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे मुख्य उद्दिष्ट ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे, तसेच ग्राहकांच्या तक्रारींवर त्वरित आणि प्रभावीपणे सोडविणे हा आहे. त्यामुळे ग्राहकांच्या हितांचे संरक्षण करण्यासाठीची हि बैठक असल्याने ग्राहकांच्या तक्रारींचे अर्ज या बैठकीत सादर करावेत. तसेच जिल्ह्यातील राशन दूकानात ग्राहकांना नियमानुसार किती रॅशन मिळते याबाबतचे दर्शनी भागात माहिती फलक लावावेत. राशन कार्डसाठी शासनाने जे नियमानुसार दर ठरविले आहेत, त्यानुसारच पैसे घ्यावेत. जास्तीचे पैसे घेवू नये. तसेच स्वयंपाकाचे गॅस सिलेंडर डिलीव्हर करणारे ग्राहकांकडून अतिरिक्त रुपयांची मागणी करतांना निदर्शनास आल्यास संबंधीतावर फौजदारी कारवाई करण्यात येणार. सर्व संबंधीत विभागांनी त्यांच्याशी संबंधीत तक्रारींची दखल घेवून, याबाबत योग्य कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी दिल्या. बैठकीत समिती विषयांवर चर्चा करण्यात आली. यामध्ये नवीन राशन कार्ड, राशन कार्ड दुरुस्ती, नाव वगळणे, जुने राशन कार्ड ऑनलाईन करण्यसाठी पैसे आकारणे. तसेच निश्चित कार्यालयीन वेळेत पुरवठा विभाग बंद असणे. सर्व तहसिल पुरवठा कार्यालयात सिसिटीव्ही कॅमेरा बसविणे, राशन दुकानदार निश्चित केलेल्या प्रमाणात राशन वाटप होत नाही. घरगुती गॅस सिलेंडरचा व्यावसायिक ठिकाणी वापर. नियमितपणे शिवभोजन केंद्रांची तपासणी, बदनापूर तालूक्यातील मौ. वाहेगाव येथील विविध समस्या, जालना शहरातील नागरीकांना चुकीच्या रक्कमेची वीज बिले, गॅस वितरण कंपनीकडून घरगुती गॅस डिलिव्हरी करतांना ४० ते ५० अधिक रुपयाची मागणी, व्यापाऱ्यांचे बचत प्रमाणपत्र लायसन्स नुतणीकरण व सेक्युरिटायझेशन ॲक्ट २००२ नुसार कार्यवाही, जालना शहरात व जिल्ह्यात महा ई-सेवा केंद्र चालकाकडून जास्तीचे पैसे घेत असल्याने ग्राहकांची होणारी लुट. जालना शहरामधील मुंद्राक व स्टॅम्प विक्रेते जास्तीचे पैसे घेणे आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. प्रारंभी जिल्हा पुरवठा अधिकारी तथा सदस्य सचिव सविता चौधर यांनी प्रास्ताविकात जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे उद्दीष्ट सांगुन मागील बैठकीबाबत झालेल्या कार्यवाहीची माहिती दिली.

## आ.खोतकर यांच्या हस्ते महानगरपालिकेत गणपतीची आरती



जालना। प्रतिनिधी

जालना शहर महानगरपालिका जालना सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ म न पा जालना आज कार्यालयात श्री गणेशाची महाआरती आमदार श्री अर्जुनरावजी खोतकर यांच्या शुभहस्ते करण्यात आली सर्व भक्तांना महाप्रसाद भंडारा वाटप केला.

यावेळी पंडितराव भूतेकर उपस्थित अधीक्षक विजय फुलंब्रीकर लेखा विभागाचे सचिन मेहरा संजय भालेराव, प्रमोद वाघमारे राजेश बगळे अजय प्रेमभर्ती बंडू चव्हाण पंडित पवार संतोष निकम सावता तरासे विकास जैस्वाल प्रफुल्ल आंबेकर अनिल वानखेडे शेख कादर देवानंद तुपेकर हितेंद्र आगळे मनोज गिरे लक्ष्मीकांत नाकडे अस्लम बेग नामदेव म्हस्के शिवाजी माली अरेफ बेग पिंपलेकर महाराज किरण पाटील दीपक देशपांडे संदीप म्हंस्के व सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. यासोबतच आज महाप्रसादाचा भांडाऱ्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे जालना शहर महानगरपालिकेत सार्वजनिक गणेश मंडळ मनपा जालना आज रोजी अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते बाप्पाची आरती करण्यात आली

# मुख्यमंत्री यांनी ओबीसी समाजाच्या भावना दुखावल्या



जालना। प्रतिनिधी

मुख्यमंत्री यांनी राज्यातील ओबीसी समाजाच्या भावना दुखावल्यामुळे जालन्यामध्ये ओबीसी समाजाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यामार्फत राज्याचे मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले. हैदराबाद गॅझेटरच्या माध्यमातून ओबीसी प्रवर्गात सरकारद्वारे करण्यात आलेल्या मराठा समाजाच्या छुप्या घुसखोरी बाबत.

दि. २/९/२०२५ रोजी हैदराबाद गॅझेटियरमधील नोंदी विचारात घेऊन, मराठा समाजातील पात्र व्यक्तींना जात प्रमाणपत्रे देण्याच्या विहित कार्यपद्धतीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे या निर्णयाद्वारे ओबीसी प्रवर्गात छुप्या पद्धतीने मराठा समाजाचा कुणबी प्रमाणपत्र देऊन घुसखोरी करण्याचा निर्णय झाल्याची भावना महाराष्ट्रातील ओबीसी भटके विमुक्त समाजाची झालेली आहे. या शासन निर्णयाचा निषेध म्हणून आज आम्ही जालना जिल्ह्यातील सर्व ओबीसी भटके विमुक्त समाज बांधव आपल्या द्वारे शासनाच्या या निर्णयाचा निषेध करत आहोत आंतरवाली सराटी , तालुका अंबड जिल्हा जालना येथील बाबासाहेब बटुळे बाबासाहेब दखणे विठ्ठल तळेकर व इतर समाज बांधवांच्या आमरण उपोषणास आम्हा सर्व समाज बांधवांचा पाठिंबा आहे. तरी शासनाने या शासन निर्णयाचा योग्य पद्धतीने तात्काळ खुलासा करून हा शासन निर्णय परत घ्यावा.आज रोजी ओबीसींच्या वतीने कलेक्टर यांना हैदराबाद गॅझेट वरच्या माध्यमातून ओबीसी प्रवर्गात सरकारद्वारे करण्यात आलेल्या मराठा समाजाच्या छुप्या घुसकोरी बाबत जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

# कळस येथे बिबट्याच्या हल्ल्यात एक जण ठार; ग्रामस्थांची पिंजरे लावण्याची वनविभागाकडे मागणी

पारनेर। प्रतिनिधी

कळस येथे मंगळवारी (दि.२ ) रात्री साडेसात वाजणेच्या सुमारास बिबट्याच्या हल्ल्यात गणेश तुळशीराम गाडगे (वय ४०) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. गावापासून सुमारे दीड किलोमीटर अंतरावर असलेल्या कळस ते सुतार वस्ती रस्त्यावर जवळ ही घटना घडली.

या बाबत माहिती आशी की, गाडगे हे आपल्या कळस गावातून आपल्या घराकडे रानमळ्याच्या रस्त्याने जात असताना त्यांच्यावर बिबट्याने अचानक हल्ला केला. गाडगे रात्री आठ वाजेपर्यंत घरी न आल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांच्या शोध सुरु केला त्या नंतर हा प्रकार उघडकीस आला. गाडगे यांना स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने पारनेर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले मात्र तो पर्यंत त्यांचा मृत्यू झाल्याने डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. कळस परिसरात उसाचे प्रमाण अधिक आहे तसेच जवळपास डोंगर भागावर वृक्षांचे प्रमानाही चांगले आहे त्यामुळे या परिसरात बिबट्यांचा नेहमीच वावर असतो. यापूर्वी या परिसरात शेळ्या मेंढया कुत्रे व इतर जनावरांवर हल्ल्याच्या घटना घडल्या आहेत. मात्र अद्याप मानवी जीवितहानी झाली नव्हती. या ठिकाणची ही पहिलीच घटना आहे. त्यामुळे गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरलं आहे. गणेश गाडगेंच्या निधनाने गावात शोककळा पसरली आहे. या घटनेनंतर ग्रामस्थांनी वनविभागाकडे बिबट्यांचा बंदोबस्त करावा त्या साठी तातडीने पिंजरे लावावेत अशी मागणी केली आहे. वनविभागाने या घटनेची गंभीर दखल घेत तपास सुरू केला असून येथे पिंजरे लावण्याचे नियोजन केले आहे.

बिबट्याचा हल्ला झाला त्या परिसरात दोन पिंजरे लावले आहेत आम्ही परिसराची पहाणी केली आहे.या कुटुंबास शासकीय मदत तातडीने मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील. त्यांना दहा लाख रुपये रोख व १५ लाख रुपयांचे मदत ठेव पावती अशी मदत सरकारच्या वतीने नियमानुसार मिळणार आहे.

## रस्त्यावरचा पोल हटविण्याची मागणी

जालना: राष्ट्रमाता कॉलेज समोरील.जिल्हा शिक्षण विभाग व प्रशिक्षण केंद्र. च्या बाजूला नवीन रोड तयार झालेला असून मेन वीज प्रवाहाचा खांब रोडच्या मध्यभागी आहे एम एस सी बी. व महानगरपालिकाचे याकडे दुर्लक्ष असल्यामुळे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता आहे तिची जबाबदारी महानगरपालिका वर राहील. तात्काळ इथला पोल हटविण्यात यावे अशी मागणी करण्यात येत आहे. (अनिल मगदुले जालना )



## सेवा पंधरवाडा साजरा करा-आ. कुचे

जालना। प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा वाढदिवस आहे. ''सेवा परमोधर्म'' उच्चारत मा. पंतप्रधान नी गरीब, शोषित वंचित यांच्या विकासासाठी सरकारच्या माध्यमातून प्रशसनीय कार्य केले आहे. मा. पंतप्रधान चा वाढदिवस ''सेवा पंधरवाडा'' म्हणून भाजपाच्या सर्व निर्वाचित जिल्हा पदाधिकाऱ्यांनी साजरा करण्याचे आव्हान भाजपा जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे यांनी केले.



भाजपा जिल्हाध्यक्ष आ. कुचे यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना झूम मीटिंग द्वारे मार्गदर्शन करताना सांगितले की ज्याप्रमाणे आपण महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा वाढदिवस सेवा पंधरवडा म्हणून साजरा केला त्याचप्रमाणे देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस हा १७ सप्टेंबर २०२५ ते २ ऑक्टोंबर २०२५ पर्यंत राबवून त्यामध्ये स्वच्छता अभियान, एक पेड मा के नाम, वृक्षरोपण कार्यक्रम, आरोग्य शिबीर, प्रबुद्ध नागरिक संवाद, दिव्यांग व अन्य प्रतिभावना व्यक्तीचा सन्मान पंडीत दिनदयाल जयंती २५ सप्टेंबर व महात्मा गांधी जयंती २ ऑक्टोंबर आदीसह कार्यक्रम राबविण्याचे आव्हान आ. कुचे यांनी करून भाजपा जालना ग्रामीण नवनिर्वाचित जिल्हा पदाधिकारी यांनी आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद, नगरपंचायत निवडणूकीत भाजपाचा झेंडा फडकविण्यासाठी ग्रामीण भागातील जनतेचे कामे करून केंद्र व राज्य शासनाच्या जन कल्याणकारी योजना तळागातील व्यक्तीपर्यंत पोहोचण्याचे आवाहन केले आहे. या बैठकीचे प्रास्ताविक गोविंद ढेंबरे यांनी केले तर आभार अनिलराव कोलते यांनी केले आहे.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/२५२
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १९/०५/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) शितल बब्रुवार वालेकर सर्व्हे नं ३५ सहन प्लॉट नं. ९ सि.स.नं. ३४३८ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. () दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- पुर्व कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम : ॲमिनीही
दक्षिण- प्लॉट नं. ०८
उत्तरः १५ डिपी रस्ता

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

**दि जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., जालना.**

**जाहीर – नम्र निवेदन**

**बँकेच्या संगणकीय प्रणालीचे अपग्रेडेशन व सायबर सुरक्षा प्रणालीचा अवलंब करुन बँकेच्या ग्राहकांना सायबर सुरक्षित व नविन संगणकिय सुविधा पुरविणेसाठी बँकेचे मुंबई येथील डाटा सेंटर मधील बँकिंग प्रणाली व हार्डवेअर याचे अपग्रेडशन व स्थानांतरण दि.०५/०९/२०२५ शुक्रवार रोजी रात्री १०.०० पासुन दि.०७/०९/२०२५ सकाळी ०६.०० वाजे पर्यतच्या कालावधी मध्ये होणार आहे. करीता सदरील वेळेतबँकेचे दैनंदिन बँकिंग व्यवहार बंद राहतील, याची बॅकेच्या ग्राहकांनी कृपया नोंद घ्यावी.**

**दि.०१/०९/२०२५ आदेशावरुन**

## भाजी मंडई स्वच्छता केली नाही म्हणून ठेकेदाराला दंड

अंबड। प्रतिनिधी

अंबड शहरात दर रविवारी मंडी भाजी मोठ्या प्रमाणात भरल्या जाते अशावेळी भाजीमंडी येथील साफसफाई करण्याची आवश्यकता ठेकेदार याची असती परंतु प्रत्यक्ष मुख्य अधिकारी यांनी भाजी मंडी परिसरामध्ये पाहणी केली असता सदरील ठिकाणी घाणीचे साम्राज्य दिसून आले यामुळे मुख्याधिकारी यांनी भाजी मंडी ठोकेदार याला दंड करण्याचे आदेश करण्यात आले. दि ०१/०९/२०२५ रोजी मा मुख्याधिकारी यांच्या सोबत प्रत्यक्ष पाहणी केली असता नगर परिषद समोर रविवारी भरणारी भाजी मंडई चा कचरा तसाच पडलेला निर्दर्शनास आलेले आहे.

मा न्यायालयाच्या गेट जवळ २ ते ३ ठिकाणी कचऱ्याचे ढीग आढळून आलेले आहे सदरी साफ सफाई ही व्यवस्थित झालेली नसून जागोजगी कचरा दिसून आला आहे. ठेकेदार यांनी सूचनांचे पालन न केल्यामुळे आपणास रु ५००/-दंड लावण्यात येत आहे तसेच यानंतर आपण सदरील भाजी मंडई ची स्वछता न केल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद व्यावी आदेशीत करण्यात येते की, संबंधित भाजीमंडी ठेकेदार यांच्या १०% सुरक्षा ठेव मधून दंडाची रक्कम रु ५००/-कपात करण्यात यावे. तसेच भाजी मंडी येथील शेतकऱ्याकडून पावती न देता जास्त पैसे घेत असल्याचे पण चर्चा होत आहे. याकडे सुद्धा लक्ष देण्याची गरज आहे.

जाहिर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ८७/२०२५**
**सदाशिव अण्णाराव उबाळे**
**विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय चऱ्हाटा**

पहा

१.सदाशिव अण्णाराव उबाळे रा. चऱ्हाटा ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत अण्णा राजाराम उबाळे यांचा दिनांक ०५/०१/१९७९ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस चऱ्हाटा ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे चऱ्हाटा ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक २८/०८/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २८/०९/२०२५ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

जाहिर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ३१५/२०२५**
**सुधाकर पि.रामा पवार**
**विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय नेकनूर**

पहा

सुधाकर पि.रामा पवार रा. नेकनूर ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक सुनिल सुधाकर पवार यांचा दिनांक १४/०५/२०१९ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस नेकनूर ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे नेकनूर ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक ----रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ---- ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-३६६**
**दिनांक -२९/०८/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती संजय सुदाम खुळे रा. अंबड ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मि ळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | कृष्णा संजय खुळे | मुलगी | १०/०५/२००० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२९/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

## गृहपयोगी संचाचे वाटप पूर्णतः नि:शुल्क-पालकमंत्री संजय शिरसाट

छत्रपती संभाजीनगर

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ व मे. मफतलाल इंडस्ट्रीज लि. यांच्या मार्फत जिल्ह्यातील १५ वितरण केंद्रांवर होत असलेल्या गृहपयोगी संचाच्या वाटपाबाबतच्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री संजयजी शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. त्यात त्यांनी हे वितरण पूर्णतः निःशुल्क असून कुणाकडून पैशांची मागणी केल्यास तात्काळ पोलिसांत तक्रार द्यावी असे आवाहन त्यांनी केले असल्याचे सहाय्यक कामगार आयुक्त ग.भा. बोरसे यांनी कळविले आहे.

बैठकीत वितरण केंद्र प्रतिनिधींना संचाचे वाटप मंडळाच्या नियमानुसार पूर्णतः नि:शुल्क करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले. केंद्रावर आर्थिक व्यवहार होत असल्यास संबंधित केंद्रावर तातडीने कारवाई करून ते बंद करण्यात येईल, असेही पालकमंत्री यांनी सूचना केल्या. संच वाटप मंडळाच्या आदेशानुसार भेट पद्धतीने होणार असून, लाभार्थ्यांनी या संकेतस्थळावर भेट देऊन नियोजित वेळ घेऊन संच मिळवण्यासाठी दिनांक व वितरण केंद्राची निवड करावी लागणार आहे. कामगारांनी ओळखपत्र/आधारकार्ड व नियुक्ती पत्र घेऊन उपस्थित राहिल्यानंतरच संच प्रत्यक्ष दिला जाईल.कामगारांना आवाहन करण्यात आले आहे की, कोणत्याही एजंट, संघटना किंवा त्रयस्थ व्यक्तीकडे न वळता थेट मंडळाच्या प्रणालीतून संच मिळवावा. पैशांची मागणी केल्यास तात्काळ जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये किंवा नियुक्ती पत्रावरील क्रमांकावर तक्रार दाखल करावी.

राज्य
लोकतंत्र
गुरूवार, दि.०४ सप्टेंबर २०२५


# खुनातील फरार आरोपी १२ तासात जेरबंद

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाणे भागातील महाराणा प्रताप चौक येथे विजय सुनील काळे व अभिषेक राम गायकवाड यांच्यात शुल्लक शाब्दिक चकमक होऊन अभिषेक गायकवाड याने आपल्याकडे असलेल्या धारदार चाकूने विजय काळे यांच्या छातीत वार करून त्याला गंभीर जखमी करून ठार मारले. खुन करून तो पळून गेला. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिस आणी गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी विविध पथके तयार करून या आरोपीला काकडहिरा परिसरात ताब्यात घेतले.

दिनांक २ सप्टेंबर रोजी शहरातील महाराणा प्रताप चौकामध्ये अभिषेक राम गायकवाड व विजय सुनील काळे यांच्या शुल्लक कारणावरून वाद होऊन



विजय काळे याच्या छातीत अभिषेक गायकवाड यांने वार करून त्याला ठार मारले. आरोपी पळून गेला. या प्रकरणी सुनील मारुती काळे यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. या फिर्यादीनुसार कलम १०३ बी. एन. एस. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा प्रकार गंभीर असल्याने याची दखल घेऊन शिवाजीनगर पोलीस ठाण्याची चार पथके आणि स्थानिक गुन्हे शाखेची दोन पथके अशी सहा पथके वेगवेगळ्या ठिकाणी पाठवण्यात आली. पोलीस रात्रभर फरार आरोपीचा शोध घेत असताना अभिषेक राम गायकवाड हा काकडहिरा शिवाराच्या परिसरात डोंगरात दबा धरून बसल्याची गोपनीय माहिती मिळाल्यावरुन या ठिकाणी पोलिसांनी छापा मारून त्याला मोठ्या शिताफिने ताब्यात घेतले. आरोपीने पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांच्या तावडीतून तो सुटू शकला नाही. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी हनपुडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर चे पोलीस निरीक्षक किशोर पवार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास मोरे, संदीप दुनघव, गजानन क्षीरसागर , वसुदेव मिसाळ, रवी आघाव, भास्कर केंद्रे, संतोष राऊत, माने, अनिता खरमाटे, ज्ञानेश्वर मराडे, बाळू रहाडे, दिलीप राठोड ,अशोक राडकर ,विलास कांदे राजाभाऊ जाधव, लादे नवनाथ डाके, लिंबाजी महानोर, अमोल लोंढे ,राहुल शिंदे, दीपक खांडेकर आदींनी केली.

# डीजे बंदी विरोधात अंबाजोगाईत साऊंड-लाईट, मंडप व जनरेटर व्यावसायिक आक्रमक

## राजकीय, शासकीय, खाजगी कार्यक्रमाला सेवा न देण्याचा निर्णय



अंबाजोगाई । प्रतिनिधी

पोलिस प्रशासनाने डीजेवर घातलेल्या बंदीच्या आदेशाचा निषेध करीत अंबाजोगाई साऊंड लाईट, मंडप व जनरेटर असोसिएशनने आक्रमक भूमिका घेतली आहे. असोसिएशनच्या शुक्रवारी झालेल्या बैठकीत कोणत्याही राजकीय, शासकीय किंवा खासगी कार्यक्रमांना साऊंड, लाईट, जनरेटर, फोकस, मंडप, वायर, डेकोरेशनसह कोणतेही साहित्य पुरविणार नाही, असा ठराव करण्यात आला.

असोसिएशनने स्पष्ट इशारा दिला की, जर कोणत्याही व्यावसायिकाने साहित्य पुरविलेच तर त्यावर असोसिएशनकडून कारवाई करण्यात येईल. इतकेच नव्हे तर असे साहित्य थेट जप्त करण्यात येईल. याचा पहिला प्रयोगही आज करण्यात आला. शहरातील एका दवाखान्याच्या नवीन इमारतीच्या उद्घाटनावेळी लावण्यात आलेले साऊंड व मंडप साहित्य असोसिएशनने जप्त करून आणले. मंडप साहित्य असोसिएशनचे तालुकाध्यक्ष अशोक बलुतकर, उपाध्यक्ष राजाभाऊ कोंबडे, कोषाध्यक्ष अर्जुन गवळी, सचिव अशोक गोचडे तसेच अंबाजोगाई तालुका साऊंड असोसिएशनचे तालुकाध्यक्ष सतिश केंद्रे, उपाध्यक्ष संतोष साबणे, कोषाध्यक्ष कृष्णा वाघमारे आणि सचिव पान २ वर

# सुगाव येथील मराठासेवक नितीन चव्हाण यांच्या पार्थिवावर शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सुगाव येथील मराठासेवक नितीन माणिकराव चव्हाण यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या आझाद मैदान, मुंबई येथे सुरू असलेल्या मराठा आरक्षण आंदोलनाच्या समर्थनार्थ शनिवारी आत्महत्या केली. त्यांच्या पार्थिवावर सुगाव येथे रविवारी शोकाकुल वातावरणात हजारो नागरिकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पिडीत कुटुंबाला



सांत्वनपर भेट दिल्यानंतर आमच्या प्रतिनिधीशी बोलताना देशमुख यांनी सांगितले की, मराठासेवक नितीन चव्हाण यांनी आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचलायला नको होते. नितीन यांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही असे राजेसाहेब देशमुख म्हणाले.

मनोज जरांगे पाटील यांच्या सध्या मुंबई येथील आझाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलना पान २ वर

# बीड ते परळी रेल्वे मार्ग कामाला गती देऊन पूर्ण करा –उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई-बीड । प्रतिनिधी

रेल्वेमार्गापासून कोसो दूर असलेले बीड शहर लवकरच रेल्वेच्या नकाशावर येणार आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी बीड ते अहिल्यानगर रेल्वे गाडी सुरू करण्यात येणार असून यामुळे अनेक वर्षापासूनचे बीडवासियांचे रेल्वेसेवेचे स्वप्न पूर्ण होणार आहे. येत्या १७ सप्टेंबर रोजी बीड ते अहिल्यानगर रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्याचा निर्णय



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत घेण्यात आला. उर्वरित बीड ते परळी वैजनाथ या रेल्वे मार्गातील अडथळे दूर करून गतीने काम पूर्ण करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी दिल्या.

बैठकीला महापारेषण कंपनीचे महाव्यवस्थापक संजीव कुमार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव श्री दशपुते, सचिव (वित्तीय सुधारणा) शैला ए, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, सहसचिव (परिवहन) राजेंद्र होळकर, रेल्वेचे मुख्य विद्युत अभियंता विनीत कुमार, रेल्वेच्या पुणे विभागाचे अप्पर विभागीय व्यवस्थापक पद्मसिंह जाधव, मुख्य प्रवासी वाहतूक व्यवस्थापक मिलिंद हिरवे, मुख्य जनसंपर्क अधिकारी स्वप्नील नीला, पान २ वर

# बीडमध्ये बालरंगभूमी परिषदेच्यावतीने सामूहिक अथर्वशीर्ष पठणाचा उपक्रम

## गणेश उत्सवानिमित्त लहानग्यांमध्ये संस्कार रुजविण्याचा प्रयत्न

बीड । प्रतिनिधी

गणेश उत्सवाचे औचित्य साधून बालरंगभूमी परिषद, बीड शाखेच्या वतीने सामूहिक अथर्वशीर्ष पठण या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम बुधवार, दि. ४ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता सौ. के. एस. के. महाविद्यालयाच्या सभागृहात होणार आहे.



या कार्यक्रमामध्ये बीडमधील विविध शाळांतील विद्यार्थी सहभागी होणार असून एकत्रितरित्या अथर्वशीर्ष पठण केले जाईल. भारतीय संस्कृती आणि परंपरेची ओळख मुलांना व्हावी तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर उत्तम संस्कार व्हावेत, या उद्देशाने हा उपक्रम राबवला जात आहे. बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष नीलमताई शिर्के- सामंत यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर विविध सांस्कृतिक उपक्रम आयोजित केले जात आहेत. त्याचाच एक भाग पान २ वर



आष्टी : माजी आमदार साहेबराव दरेकर नाना यांच्या ८० वया वाढदिवसानिमित्त त्यांच्या निवासस्थानी कार्यकर्ते व्यापारी सर्व स्तरातील त्यांच्या चाहत्यांनी सकाळपासून शुभेच्छा देण्यासाठी गर्दी केली यामध्ये माजी आमदार शिक्षण महर्षी भीमरावजी धोंडे साहेब माजी जी प सदस्य देविदास आबा धस , युवा नेते जयदत्त भय्या धस श्याम भैया धस सागर आप्पा धस जि प सदस्य सतीश आबा शिंदे, शहरातील व्यापारी आदींनी नानांचा सत्कार केला

# छत्रपती शिवाजी महाराज शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनला पदच्युत करण्याची मागणी

बीड । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या. बीड या संस्थेच्या चेअरमन श्रीराम बाबासाहेब बहिर यांना पदावरून पदच्युत करण्याची मागणी संस्थेच्या संचालक मंडळातर्फे करण्यात आली आहे. याबाबतचा अधिकृत प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक (संस्था), बीड यांच्याकडे पाठविण्यात आला आहे.

बहिर हे ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सेवेतून निवृत्त झाले असून, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार सेवानिवृत्तीबरोबर चेअरमन पदाचा राजीनामा देणे आवश्यक असते. मात्र त्यांनी तो राजीनामा न दिल्याने पतसंस्थेच्या कामकाजात अडथळे निर्माण झाले आहेत.

प्रलंबित प्रकरणे व कारभार ठप्प

चेअरमनच्या न राजीनाम्यामुळे संस्थेतील अनेक दैनंदिन व्यवहार व आर्थिक बाबी प्रलंबित राहिल्या आहेत. सदस्यांचे कामकाज ठप्प झाल्याने संस्थेच्या सुरळीत व्यवस्थापनात गोंधळ निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर संचालक मंडळाने बबेर यांना पदावरून पदच्युत करण्याची मागणी केली आहे.

लेखापरीक्षणातील त्रुटींचा उल्लेख

संचालक मंडळाच्या निवेदनात असेही नमूद केले आहे की २००००१ पासून २००९ व २०१६ या कालावधीत झालेल्या लेखापरीक्षणात अनेक त्रुटी ( ) आढळून आल्या आहेत. त्या आजतागायत निस्तरल्या गेलेल्या नाहीत. त्यामुळे या कालावधीतील विशेष लेखापरीक्षण ( ) करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

प्रशासनाकडे प्रस्ताव दाखल

संचालक मंडळाचे प्रतिनिधी भगवान पवार व अंकुश निर्मळ यांनी २ सप्टेंबर रोजी हा लेखी प्रस्ताव सादर केला. आता जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून पुढील कारवाई कशी होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# परळीतील चिमुरडीवर अत्याचार प्रकरणातील आरोपीला फाशीची शिक्षा द्या - कॉ.बब्रुवाहन पोटभरे, विनोद शिंदे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

परळीच्या रेल्वे स्थानक परिसरात शनिवारी चिमुरडीवर झालेल्या बलात्कार प्रकरणातील आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी कॉ.बब्रुवाहन पोटभरे, विनोद शिंदे यांच्यासह शिष्टमंडळाने उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना मंगळवारी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

दिलेल्या निवेदनात मागणी करताना नमूद केले आहे कि,



रविवार, दिनांक ३१ ऑगस्ट रोजी परळी रेल्वे स्टेशन येथे ही अमानुष घटना दलित समाजातील रोजगाराच्या शोधात असलेल्या भटकंती मजुराच्या निष्पाप लेकरा सोबत घडली, देशात सध्या दलित व कमजोर वर्गातील स्त्रियांवर अन्याय व अत्याचारांचे प्रमाण वाढलेले आहे, पोलीस व सरकारी यंत्रणा या केवळ पाट्या टाकायचे काम करतात. त्यामुळे समाजात अराजक सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. दलित व स्त्री अत्याचार हा केवळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न नसून तो प्रश्न सामाजिक व राजकीय आहे, समतामूलक प्रयत्नांची व आरोपींना कठोर शासन होण्याची गरज आहे, या प्रकरणी पंढरपूरच्या या वाघमारे कुटुंबाला व त्याच्या लहान मुलीला न्याय मिळण्यासाठी कोणताही कसूर होऊ पान २ वर

# मोंढा गणपतीला साडेतीन शक्तीपीठांचा देखावा:भाविकांना अनोखा भक्तीमय अनुभव

## आज महाप्रसाद व महारक्तदान शिबिराचे आयोजन, सर्व भाविकांना उपस्थित राहण्याचे आवाहन

**माजलगाव । प्रतिनिधी**

**माजलगाव येथील प्रसिद्ध मोंढा गणपती मंडळाने यंदा गणेशोत्सवाच्या निमित्ताने आकर्षक साडेतीन शक्तीपीठांचा देखावा साकारला आहे.धार्मिकता, कलात्मकता आणि आधुनिक प्रकाशयोजनेचा अनोखा संगम साधत भाविकांना एक आगळीवेगळी भक्तीमय अनुभूती मिळत आहे.**

या देखाव्यात तुळजाभवानी (तुळजापूर), महालक्ष्मी (कोल्हापूर), रेणुकामाता (माहूर) आणि सप्तशृंगी देवी (वणी अर्धपीठ) यांची सुंदर रचना करण्यात आली आहे.प्रत्येक शक्तीपीठाचे सुस्पष्ट माहितीफलक यामुळे भाविक थक्क होत आहेत. विशेष म्हणजे, संध्याकाळच्या वेळी याठिकाणी केली गेलेली आकर्षक रोषणाई आणि फवाऱ्यांचे कारंजे देखाव्याला अधिक भव्यतेची जोड देतात.आज, दिनांक ०४ सप्टेंबर रोजी, मंडळाच्या वतीने सकाळी ८:०० ते ११:०० वाजेपर्यंत महाप्रसादाचे व सकाळी ०७:०० ते दुपारी ४:०० वाजेपर्यंत महारक्तदान शिबिर आयोजन करण्यात आले असून, स्थानिक ब्लड बँकेच्या



सहकार्याने हे शिबिर पार पडणार आहे. मंडळाने सर्व श्रद्धाळू भाविक व नागरिकांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जपत, मंडळाचे हे उपक्रम स्तुत्य ठरत आहेत. धार्मिकतेबरोबरच समाजसेवेचा आदर्श या निमित्ताने समोर येत आहे. हजारो भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग आणि मंडळाच्या कार्यकर्त्यांचे परिश्रम यामुळे यंदाचा मोंढा गणपती उत्सव संस्मरणीय ठरत आहे.

# बाबुराव पवारांचे व्यक्तित्व प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहे-प्रा.लक्ष्मण गुंजाळ



बीड । प्रतिनिधी

प्राथमिक शिक्षक ते केंद्रप्रमुख या पदापर्यंत पोहोचलेले श्री बाबुराव भासूनाईक पवार सर यांचे शैक्षणिक कार्य हे उल्लेखनीयआहे पण त्याचबरोबर जालना शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन आणि प्राथमिक शिक्षक परिषदेचे सक्रिय कार्यकर्ते या माध्यमातून त्यांनी केलेले कार्य हे निश्चितपणे मूल्याधिष्ठित आहे. इतर शिक्षकांसाठी ते प्रेरणादायी आहे असे गौरवोद्गार ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा.लक्ष्मण गुंजाळ यांनी काढले.

केंद्रप्रमुख श्री बाबुराव पवार यांच्या सेवा गौरव सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ता. ३१ ऑगस्ट रोजी नेर तालुका मंठा जिल्हा जालना येथील वटेश्वर संस्थानच्या भव्य सभागृहात गुंजाळ हे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार प्राचार्य धोंडीराम राठोड होते तर या समारंभाला प्रमुख उपस्थिती महंत विठ्ठलमहाराज गिरी यांची होती. अध्यक्षीय भाषणात माजी आमदार राठोड म्हणाले की बाबुराव पवार हे माझ्या संस्थेतील आणि विशेष म्हणजे माझे विद्यार्थी असल्याने मला त्यांचा विशेष अभिमान पान २ वर

# सचिन शिंदे अर्थशास्त्र विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण

बीड । प्रतिनिधी

बीड शहरापासून आठ किलोमीटर अंतरावरती असलेल्या वरवटी येथील सामान्य कुटुंबातील सचिन बबनराव शिंदे याने मोठ्या मेहनतीने व जिद्दीने सहाय्यक प्राध्यापक पदासाठी आवश्यक असणारी सेट परीक्षा अभ्यासाच्या जोरावर उत्तीर्ण केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सचिन अर्थशास्त्र विषयांमध्ये नावलौकिक कमावून अर्थशास्त्रामध्ये पुढील काळात योगदान देण्याचा प्रयत्न करणार आहे.



सचिनचे पहिली ते पाचवी शिक्षण जिल्हा परिषद शाळा वरवटी व पुढे दहावीपर्यंतचे शिक्षण सरस्वती विद्या मंदिर बीड येथे झाले. त्याने इयत्ता दहावीला ६४.४०% गुण मिळवले होते. त्यानंतर त्याचे अकरावी व बारावीचे बलभीम महाविद्यालय बीड येथे झाले. बारावीला त्याने ७८.२१% गुण घेत यशाची पायरी चढत असल्याची चुणूक दाखवून दिली होती. पुढे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी त्याने बलभीम महाविद्यालय बीड येथेच येथे प्रवेश पान २ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# वायसीएम रुग्णालयात अत्याधुनिक ट्रायेज व पुनर्जीवन सुविधा कार्यान्वित

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयाने आपत्कालीन विभागात अत्याधुनिक रुग्ण निवड आणि पुनर्जीवन सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. यामुळे आपत्कालीन सेवांना बळकटी मिळणार आहे. डाना टीएम फोर इंडिया लिमिटेड यांच्या सीएसआर उपक्रमांतर्गत या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते या नवीन सुविधांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी डाना टीएम फोर इंडिया लिमिटेडचे प्लांट हेड शिवाजी निळकंठ, एचआर व प्रशासन विभागाच्या प्रमुख



योगिता सुषीर यांच्यासह रुग्णालयातील डॉक्टर्स, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नियोजित ट्रायेज सुविधेमुळे रुग्णांच्या प्रकृतीच्या गंभीरतेनुसार त्यांचे जलद मूल्यमापन आणि प्राधान्यक्रम ठरविणे शक्य होणार आहे. तर पुनर्जीवन सुविधेमुळे आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यास मदत होणार आहे. गंभीर आजारी रुग्णांना जलद, प्रणालीबद्ध आणि उच्च गुणवत्तेची सेवा देण्यासाठी या सुविधा उपयुक्त ठरणार आहेत.

**आपत्कालीन सेवांना मिळणार बळकटी**

डाना टीएम फोर इंडिया लिमिटेड यांच्या सहकार्याने या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. तातडीच्या वैद्यकीय उपचारांची आवश्यकता असलेल्या रुग्णांची सेवा करण्याच्या रुग्णालयाच्या क्षमतेत यामुळे नक्कीच वाढ होईल.

–डॉ. राजेंद्र वाबळे, अधिष्ठाता, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय

शहरी तसेच ग्रामीण भागातील गरीब, बेघर आणि रोजगारासाठी राज्यातील इतर तसेच परराज्यातून आलेल्या रुग्णांना तातडीची मदत देण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय अविरत काम करते. या रुग्णालयाला सीएसआर फंडातून मदत करता आल्याचा खूप आनंद होत आहे.

–शिवाजी निळकंठ, प्लांट हेड, डाना टीएम फोर इंडिया लिमिटेड

# पुणे बाजार समिती तूर्त राष्ट्रीय नाही; पहिल्या टप्प्यात फक्त मुंबई, नागपूर

**पुणे । प्रतिनिधी**

बाजार समितीच्या पहिल्या टप्प्यात राष्ट्रीय बाजार करण्याच्या अधिसूचनेत केवळ मुंबई, नागपूर समितीचा समावेश असून त्याचा मसूदा राज्यपालांच्या सहीसाठी सादर झाल्याची माहिती पणन विभागातील सुत्रांनी दिली. यामुळे पहिल्या टप्प्यातून पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीसह अन्य ३ बाजार समितींना तुर्तास वगळले आहे. यामुळे पुण्यातील समितीवर निवडून आलेल्या १८ संचालकांना दिलासा मिळाला आहे.

तुमचा कालावधी होईपर्यंत राष्ट्रीय बाजार होऊ देणार नाही. मात्र, नीट काम करण्याच्या सुचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संचालकांना दिल्या आहेत. पुणे जिल्ह्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कायमच वर्चस्व असून आपले राजकीय वजन वापरून त्यांनी पुण्याला यादीतून वगळल्याचे समजते. यामागे यशवंत सहकारी कारखान्याच्या ९९ एकर जमिनीच्या खरेदीचा व्यवहार असल्याची चर्चा आहे.

३०० कोटींचा हा व्यवहार असून, तो राष्ट्रीयकरणामध्ये अडकू नये, यासाठी पवार यांनी आग्रह धरल्याचे कळते. केंद्राच्या पणन सुधारणांमध्ये बाजार समित्या राजकारणांपासून मुक्त करणे महत्त्वाचा भाग आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बाजार समित्यांचे राष्ट्रीयीकरणाच्या बदलांना गांभिर्याने घेत, हा निर्णय घेतला. यानुसार जेथे एकुण आवकेच्या ३० टक्के शेतमाल हा तीनपेक्षा अधिक राज्यांमधून येतो त्या समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्याचे ठरले



आहे.

यानुसार मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, सोलापूर, कोल्हापूर, सांगली या समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्यास राज्य मंत्रीमंडळाने मान्यता दिली होती. मुख्यमंत्री फडणवीस यांनी बाजार समित्यां राष्ट्रीय करण्याच्या अधिसूचनेचा मसूदा राज्यपालांकडे स्वाक्षरीसाठी पाठविला आहे. पहिल्या टप्प्यात दोन समित्या राष्ट्रीयकृत झाल्यावर बाकीच्या कधी होणार, हे सध्या अनिश्चित आहे.मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रशासकपदी पणन संचालक विकास रसाळ यांची नियुक्ती केली आहे. या बाजार समितीच्या संचालक मंडळाची मुदत ३१ ऑगस्ट रोजी संपल्याने रसाळ यांची नियुक्ती केली आहे.

# पुणेकरांना गुडन्यूज; मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यात आणखी २ स्थानक मिळणार; मंत्रिमंडळ बैठकीत ६८३ कोटीं मंजूर

**पुणे । प्रतिनिधी**

**पुणेकरांसाठी एक आंनदाची बातमी आहे. मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यात आणखी २ स्थानके पुण्याला मिळणार आहेत, बुधवारच्या मंत्रिमंडळ बैठकीत ६८३ कोटीं मंजूर झाल्याची माहिती समोर आली आहे. पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प टप्पा-२ च्या विस्तारित मार्गावर स्वारगेट ते कात्रज या कॉरिडॉरवर दोन नवीन स्थानके उभारण्याच्या प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. बालाजीनगर व बिबेवाडी येथे ही दोन मेट्रो स्थानके उभारली जाणार असून त्यासाठी येणाऱ्या ६८३.११ कोटी रुपयांच्या अतिरिक्त खर्चास तत्त्वत: मान्यता देण्यात आली आहे.**

पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प टप्पा-२ च्या विस्तारित मार्गावर स्वारगेट ते कात्रज या कॉरिडॉरवर दोन नवीन स्थानके उभारण्याच्या निर्णयामुळे पुणे



शहरातील दक्षिण भागातील नागरिकांसाठी मेट्रो प्रवास अधिक सुलभ होणार असून वाहतूक कोंडी कमी करण्यास मोठी मदत होणार आहे. उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा प्रश्न मार्गी लागला आहे.या प्रकल्पासाठी पुणे महानगरपालिकेचा २२७.४२ कोटी रुपये, 'ईआयबी'चे द्वीपक्षीय कर्ज ३४१.१३ कोटी रुपये, तर राज्य करांसाठी राज्य शासनाचे दुय्यम कर्ज ४५.७५ कोटी रुपये व व्याज रक्कमा राज्य शासनाचे अतिरिक्त बिनव्याजी दुय्यम कर्ज ६८.८१ कोटी रुपये अशा मिळून एकूण ६८३.११ कोटी रुपयांच्या अतिरिक्त खर्चास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे पुणे मेट्रो टप्पा-२ चा विस्तार अधिक कार्यक्षम होऊन पुणेकरांना आधुनिक, जलद आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतुकीचा लाभ मोठ्या प्रमाणात मिळणार आहे.

# पालिकेतील ९ गावांच्या डीपीसाठी मुदतवाढ

पुणे । प्रतिनिधी

गावे समाविष्ट होऊन आणि वारंवार मुदतवाढ देऊनही गेल्या आठ वर्षांत महापालिका प्रशासनाला नऊ गावांचा विकास आराखडा तयार करता आलेला नाही. अखेर जानेवारी महिन्यापासून गावांचा विकास आराखडा तयार करण्याचे काम राज्य सरकारच्या नगररचना विभागाने सुरू केले आहे.

मात्र, त्यासाठी सप्टेंबर २०२५ पर्यंत मुदत दिली होती. ही मुदत समाप्त होत असल्याने नगररचना विभागाने विकास आराखडा तयार करण्यास मुदतवाढ देण्याची मागणी राज्य शासनाकडे केली आहे.महापालिकेच्या हद्दीत ३४ गावे टप्याटप्याने समाविष्ट करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. त्यानुसार पहिल्या टप्प्यात म्हणजे ४ ऑक्टोंबर २०१७ मध्ये



११ गावे समाविष्ट करण्यात आली.त्यामध्ये लोहगाव आणि मुंढव्यातील उर्वरित भाग, साडेसतरानळी, उत्तमनगर, शिवणे, आंबेगाव खुर्द, उंड्री, धायरी, आंबेगाव बुद्रुक, फुरसुंगी आणि उरुळी देवाची ही गावे पुणे महापालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आली. त्यानंतर जवळपास एक वर्षांनी म्हणजे ४ डिसेंबर २०१८ मध्ये या गावांचा विकास आराखडा तयार करण्याचा इरादा महापालिकेकडून प्रसिद्ध करण्यात आला.परंतु, २०१९ मधील लोकसभा, विधानसभा तसेच वाढीव हद्दीतील पोटनिवडणुका लागल्या. त्या झाल्यानंतर २०२० फेब्रुवारीपासून राज्यात करोनाचा संसर्ग सुरू झाला. परिणामी, प्रारूप आराखडा तयार करण्याचे काम रखडले.दरम्यान, महापालिकेस मुदतवाढ न देता, तो मुदतीत तयार केला नाही म्हणून तयार केलेला प्रारूप विकास आराखडा राज्य सरकारकडून ऑगस्ट २०२४ मध्ये रद्द करण्यात आला. तसेच, या गावांसाठी नव्याने आराखडा तयार करण्याचे अधिकार नगररचना विभागाला दिले.दरम्यान, फुरसुंगी आणि उरुळी देवाची या दोन गावांसाठी नगरपालिका स्थापन झाल्याने यातून ही दोन गावे वगळण्यात आली. त्यामुळे आता नऊ गावांचा विकास आराखडा तयार करण्याचे काम नगररचना विभागाकडून सुरू आहे. जानेवारी २०२५ पासून नगररचना विभागाने या गावांचा विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली.नगररचना विभागाकडून विकास आराखडा तयार करण्याचे काम सुरू असून, त्यास मुदतवाढ देण्याची मागणी शासनाकडे केली आहे, अशी माहिती नगररचना विभागातील अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

# चैतन्य विद्यालयाच्या गणरायाला विविध पथकांनी दिली मानवंदना



**ओतूर । प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील ग्राम विकास मंडळ संचलित चैतन्य विद्यालयाच्या गणपती बाप्पाला सातव्या दिवशी मोठ्या उत्साहात निरोप देण्यात आला. ढोल-ताशांचा गजर, विविध पथकांचे कलाप्रदर्शन आणि शिस्तबद्ध मिरवणूक यामुळे वातावरण भक्तिमय झाले असल्याचे मुख्याध्यपक राजश्री भालेकर यांनी सांगितले.

यावर्षीच्या गणेश विसर्जन मिरवणुकीत ढोल पथक, झेंडा पथक, झांज पथक, छावा थीम पथक, लेझीम पथक, विविध वेशभूषा, आदिवासी नृत्य, जोगवा, हवा हवाई पथक, टाळ पथक, पर्यावरण पथक, व्यसनमुक्ती पथक आणि स्वयंसेवक पथक अशा विविध पथकांचा समावेश होता.

या सर्व पथकांनी आपल्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली आणि संपूर्ण ओतूर परिसर ढोल-ताशांच्या गजराने दुमदुमून गेला. चैतन्य विद्यालयाने आयोजित केलेली ही मिरवणूक शिस्तबद्धतेमुळे लक्षवेधी ठरली.

# पुण्यात मानाचे गणपती मिरवणुकीचे वेळापत्रक समोर, कसा असेल मार्ग? अमितेश कुमारांनी दिली माहिती

**पुणे । प्रतिनिधी**

**देशभरात यंदा गणपती मिरवणूकांचा जल्लोष पहायला मिळणार असून ६ सप्टेंबर रोजी शनिवारी गावोगावी आणि घरोघरी बाप्पाला वाजत गाजत निरोप दिला जाईल .पुण्याच्या पारंपरिक गणपती विसर्जनासाठी पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे . मानाच्या पाच गणपती बाप्पासह इतर गणेश मंडळांसाठी नियमावली जाहीर करण्यात आली आहे . पुण्यात विसर्जनादिवशी होणाऱ्या गर्दीच्या पाश्वभूमीवर यंदा विसर्जनाच्या वेळा प्रशासनानं ठरवून दिल्या आहेत . पुण्यातील गणेशोत्सवाचा उत्कर्षबिंदू असलेली विसर्जन मिरवणूक यंदा ठरावीक वेळापत्रकानुसार पार पडणार आहे. पोलिस प्रशासन आणि गणेश मंडळांना नियमावली कळवण्यात आली असून यंदा शिस्तबद्ध आणि सुरक्षित पद्धतीने मिरवणूक पार पडावी यासाठी विशेष खबरदारी घेण्यात आली आहे.**

पुण्यातील मानाच्या गणपतींच्या विसर्जन मिरवणुकीसंदर्भात यंदाचे वेळापत्रक आणि मार्ग जाहीर करण्यात आला आहे. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी याची माहिती देत मिरवणूक शिस्तबद्ध, सुरक्षित आणि वेळेत पार पडावी यासाठी नियमावली लागू केली असल्याचे सांगितले. शहरातील नागरिक आणि गणेश मंडळांना या नियमानुसारच सहभागी व्हावे, असे आवाहनही प्रशासनाकडून



करण्यात आले आहे. पुण्याचा पहिला मानाचा कसबा गणपती सकाळी ९:१५ वाजता मंडईतील टिळक पुतळा येथे पोहोचेल. त्यानंतर सकाळी ९:३० वाजता मिरवणुकीची सुरुवात होईल. कसबा गणपती सकाळी ९:३० वाजता बेलबाग चौकात दाखल होऊन १०:१५ वाजता लक्ष्मी रोडकडे मार्गस्थ होईल. दुसरा मानाचा तांबडी जोगेश्वरी गणपती सकाळी १०:३० वाजता बेलबाग चौकातून लक्ष्मी रोडकडे जाईल. सहावा मानाचा महापालिका गणपती आणि सातवा त्वेष्ट कासार गणपती दुपारी १:०० वाजता मिरवणुकीत सामील होतील.

लक्ष्मी रोड आणि शिवाजी रोडवरील मंडळे दुपारी ३:४५ वाजता मुख्य मिरवणुकीत सामील होतील. श्रीमंत दगडूशेठ गणपती दुपारी ४:०० वाजता, तर जिलब्य मारुती आणि अखिल मंडई गणपती मंडळ संध्याकाळी ५:३० नंतर मिरवणुकीत सहभागी होतील. प्रशासनाच्या नियोजनानुसार संध्याकाळी ७:०० वाजेपर्यंत बेलबाग चौक रिकामा करण्यात येणार आहे.

मंडळांना ठरवून दिलेल्या मार्गानेच विसर्जन मिरवणुकीत सामील होता येणार आहे. लक्ष्मी रोडवरील मंडळे फक्त बेलबाग चौकातून प्रवेश करतील. कसबा गणपती जाईपर्यंत अलका टॉकीज चौकाजवळ इतर मंडळांना थांबावे लागेल. मिरवणुकीदरम्यान मंडळांमध्ये अंतर राखणे बंधनकारक असून रेषा तोडण्यास परवानगी नाही.

टिळक पुतळा ते बेलबाग चौक या दरम्यान ढोल-ताशा वाद्य वाजवण्यास बंदी आहे. फक्त बेलबाग चौकानंतरच त्यांना परवानगी दिली जाईल. प्रत्येक मंडळाला डीजे किंवा ढोल-ताशा पथक यापैकी एकच ठेवता येईल. जास्तीत जास्त २ ढोल-ताशा गटांना परवानगी असून प्रत्येकीत ६० सदस्य असतील. तसेच ढोल-ताशा गटांनी विसर्जनानंतर अलका टॉकिज चौकात परतीच्या मार्गाने जाऊ नये, अशी स्पष्ट सूचना देण्यात आली आहे. बेलबाग चौकात परिशिष्ट १, २ आणि ३ मधील मंडळांना प्राधान्य दिले जाईल. इतर मंडळांना 'पहिले येणाऱ्यास प्रथम संधी' या तत्त्वावर संधी दिली जाईल. टिळक रोड, कुमठेकर रोड आणि केळकर रोडवरील मिरवणुका सकाळी १०:३० पूर्वी सुरू होऊ नयेत, असा आदेशही देण्यात आला आहे.

# पुणे-नाशिकचा प्रवास दोन तासांनी कमी होणार; वाहतूक कोंडी कमी करण्याचा उद्देश

पुणे । प्रतिनिधी

नाशिक फाटा ते राजगुरुनगर (खेड) या ३० किलोमीटर लांबीच्या पुणे-नाशिक महामार्गाचे उन्नतीकरण होणार आहे. या प्रकल्पामुळे सध्या दीड ते दोन तास लागणारा प्रवास अवघ्या ३० मिनिटांत पूर्ण होईल. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून (एनएचएआय) या प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया सुरू असून, २५ सप्टेंबर रोजी निविदा खुल्या करण्यात येणार आहेत. या कामासाठी सुमारे १४ हेक्टर जमीन संपादित करावी लागणार आहे. प्रस्तावित मार्गिका प्रामुख्याने 'पीएमआरडीए'च्या हद्दीत येते. मुख्यमंत्री स्तरावर झालेल्या बैठकीत ऑक्टोबरपूर्वी भूसंपादन पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र, ८० टक्के भूसंपादन पूर्ण झाल्याशिवाय प्रत्यक्ष काम सुरू करता येणार नाही, असे एनएचएआयने स्पष्ट केले आहे.

या प्रकल्पाचा उद्देश शहरी वाहतूक कोंडी कमी करणे हा आहे. विद्यमान पुणे-नाशिक महामार्गाचे रुंदीकरण आणि उन्नत मार्गिका बांधकाम यात समाविष्ट



आहे. केंद्र सरकारने गेल्या वर्षी या प्रकल्पासाठी ७८२७ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर चाकण एमआयडीसीशी जोडणाऱ्या महामार्गावरील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होईल, अशी अपेक्षा आहे. पीएमआरडीए क्षेत्रातील १५० जमीनमालकांकडून सुमारे ९.७४ हेक्टर जमीन संपादित होणार आहे. ही जमीन नाणेकरवडी, वाकी खुर्द, वाकी बुद्रुक, चिंबळी, कुरुळी, मेदनकरवाडी आणि चाकण परिसरातील आहे. भूसंपादन प्रक्रिया गतीमान करण्यासाठी हस्तांतरण विकास हक्क (टीडीआर) किंवा चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय)चा वापर केला जाणार आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील भोसरी आणि मोशी भागातही भूसंपादनाची आवश्यकता आहे. महापालिकेने बहुतांश जमीन टीडीआर आणि एफएसआयच्या बदल्यात आधीच संपादित केली आहे. उर्वरित जमीन संपादित करण्यासाठी राज्य सरकारकडे निधी मागण्यात आल्याचे सांगण्यात आले. या मार्गिकेसाठी एकूण १० प्रवेश आणि निर्गमनमार्ग असतील. प्रकल्पाची लांबी ३० किलोमीटर असून, एकूण १४ हेक्टर जमिनीचे संपादन आवश्यक आहे. २५ सप्टेंबर ही निविदा प्रक्रियेची अंतिम मुदत ठरविण्यात आली आहे. या उन्नत मार्गिका प्रकल्पासोबतच बालेवाडी ते शेडगे वस्ती, सूर्या हॉस्पिटल ते ठाकर वस्ती आणि नांदे-माण रोड यांसारखी रस्ते विस्ताराची कामे सुरू आहेत. त्याचबरोबर बहुप्रतिक्षित पुणे वर्तुळाकार रस्त्याचे कामही टप्प्याटप्प्याने होत आहे. या सर्व प्रकल्पांमुळे शहरी गतिशीलता सुधारेल आणि औद्योगिक तसेच निवासी विकासाला चालना मिळेल.

# ऑगस्टमध्ये मेट्रो प्रवासी संख्या ७० लाखांच्या घरात

**पुणे । प्रतिनिधी**

तीन महिन्यांपासून मेट्रो प्रवासी वाढत असून ऑगस्टमध्ये ही संख्या ७० लाखांवर पोहचली आहे. मे मध्ये ४७ लाखांपेक्षा अधिक प्रवाशांनी मेट्रोचा वापर केला होता, जूनमध्ये हा आकडा ५२ लाखांवर तर जुलैमध्ये ५९ लाखांवर गेला. ऑगस्टमध्ये हा आकडा ६९ लाख ४८ हजार ५८८ पर्यंत गेला असून या आकडेवारीकडे पाहिल्यावर तीन महिन्यांत मेट्रोचे प्रवासी ४६ टक्क्यांनी वाढले आहेत.



गणेशोत्सवात मध्यवर्ती पेठांतील बहुतांश भाग वाहतुकीसाठी बंद असतो. यावेळी नागरिकांना आपली वाहने लांब लावून चालत मध्यवर्ती भागात यावे लागत होते. यावर्षी पहिल्यांदाच मध्यवर्ती भागातील जिल्हा न्यायालय ते स्वारगेट मेट्रोचा टप्पा सुरू असल्याने लोक तेथे येण्यासाठी मेट्रोचा वापर करत आहेत.

मेट्रोचा वापर करणाऱ्यांची संख्या तीन महिन्यांपासून वाढत आहे. जूनमध्ये पहिल्यांदा मेट्रोच्या प्रवासी संख्येने ५० लाखांचा टप्पा पार केला. त्यामागचे कारण म्हणजे वारीदरम्यान पुण्यात आलेले वारकरी. जुलैमध्ये शैक्षणिक सुरू झाल्याने विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर मेट्रोचा वापर केल्याने हा आकडा वाढम्यास मदत झाली.जुलै महिन्यात मेट्रोची प्रवासी संख्या १० लाखांनी वाढून ५९ लाखांवर गेली. विद्यार्थ्यांचे वाढलेले प्रमाण आणि गणेशोत्सवामुळे पुणे मेट्रोने सरासरी २ लाख प्रवासी संख्येचा टप्पा पार करत आघाडी घेतली. सध्याच्या गेल्यावर्षीच्या प्रवासी संख्येशी तुलना केली असता ही संख्या दुप्पट आहे.पुणे मेट्रोवरील खर्च भरून निघण्यासाठी दिवसाला ६ लाखांहून अधिक प्रवाशांनी त्यातून प्रवास करणे आवश्यक आहे. तो आकडा अजून खूप लांब असला तरी त्या दिशेने पुणे मेट्रोची वाटचाल सुरू आहे.